# आदित्यदीप

वर्ष : १३ / अंक : ३

जुलै ते सप्टेंबर २०२२

‘यज्ञो वै श्रेष्ठतमं कर्म ।’ (शतपथ ब्राह्मण १.७.१.५)





वैश्विक संत विद्यापीठ भूमीवर महाविष्णुयाग संपन्न

जुलै ते सप्टेंबर २०२२ शके १९४४

"आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।।"



# आदित्यदीप



कार्यकारी संपादक
सौ. अपर्णा अभ्यंकर

(आदित्य प्रतिष्ठानचे वार्तापत्र)

संस्थापक-संपादक
गुरुदेव शंकर अभ्यंकर

वर्ष : १३ अंक : ३

## अंतरंग

संपादकीय – भारताच्या नवनिर्वाचित पंधराव्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू
– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर ३



बहुतांची अंतरे ६

वैश्विक संत विद्यापीठ भूमीवर श्रीमहाविष्णुयाग
– सौ. प्राजक्ता नितीन जोशी १०





श्रीमहाविष्णुयागामध्ये पंचमहाभूतांचे सहकार्य
– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर १५

धन्य धन्य शिवराय – एक स्फूर्तिदायी कार्यक्रम
– सौ. रश्मी अरुण तुळजापूरकर १६



वैश्विक संत भारती – एक दिव्य संकल्प
– श्री. अभय भंडारी १७





रंगावली प्रदर्शनाचे उद्‌घाटन १९

स्वा. सावरकर चिंतन सूत्रे – ग्रंथ प्रकाशन २०





वारकरी कीर्तन- 'पांडुरंग जाणे भाव'
– सौ. सुलभा श्रीकांत आठवले २१

शङ्कर रामायण-अरण्यकाण्ड
– श्रीमती वंदना जोशी २५



बालगंधर्व संगीत रसिक मंडळ - गौरव समारंभ २९





हे पाठ कराच! – गुर्वष्टकम् ३०

अध्यात्मबोध – गुरुदेव ३३



संत एकनाथांची नीती – ३५




कथ्थक परंपरेचा सन्मान – ३६

आनंदवार्ता

यापुढचा ऑक्टोबरचा दीपावली विशेषांक डिजिटल नसून छापील स्वरूपात वाचावयास मिळेल.

संपादकीय



# भारताच्या नवनिर्वाचित पंधराव्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर





दि. २५ जुलै २०२२ रोजी भारत देशाच्या पंधराव्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपतिपदाची शपथ घेतली आणि भारतातील नव्हे जगातील सर्वांनी अभिमानाने पहावे अशी ही घटना घडली. द्रौपदी मुर्मू या जनजातीतील संथाल जमातीमध्ये ओडिशामध्ये एका छोट्या खेडेगावात जन्मलेल्या भगिनी आहेत. भारतामध्ये जातीला नाही तर गुणाला महत्त्व दिले जाते हे पंतप्रधान मोदीजींनी पुन्हा एकदा सिद्ध केले. योगायोग असा की स्वामी विवेकानंदांनी ज्या संथाल समाजातील लोकांचा विशेष गुणगौरव केला त्याच संथाल जमातीचे द्रौपदीजी प्रतिनिधित्व करत आहेत. तसेच स्वतंत्र भारतात जन्मलेल्या त्या पहिल्या राष्ट्रपती आहेत.

**व्यक्तिगत जीवन –** द्रौपदी (मूळ नाव पुती अर्थात पुत्री) मुर्मू यांचा जन्म २० जून १९५८ ला ओडिशातील मयूरभंज जिल्ह्यातील बडीपोसी गावात संथाल या जनजातीतील एका कुटुंबात झाला. स्वातंत्र्यलढ्यातील वीर तिलका मांझी हेही याच संथाल जनजातीतील मुर्मू परिवारातील होते. त्यांच्या वडिलांचे नाव बिरंची नारायण टुडु असे होते. त्यांचे वडील आणि आजोबा दोघेही त्या गावातील प्रमुख होते.

चार वर्षांची द्रौपदी तुडू (माहेरचे नाव) वडिलांबरोबर शाळेत आल्याचा दिवस त्यांचे शिक्षक वसंतकुमार गिरी यांना आजही आठवतो. ‘ती चुणचुणीत मुलगी अभ्यासात पहिला नंबर मिळवायची आणि प्रत्येक वक्तृत्व स्पर्धेतसुद्धा

तिला पहिले बक्षीस मिळायचे.' असे सांगताना त्यांचे डोळे भरून आले.

त्या भुवनेश्वरच्या रमादेवी महाविद्यालयातून १९७९ मध्ये बी.ए. उत्तीर्ण झाल्या. त्यांनी पाटबंधारे खात्यात आणि ऊर्जा खात्यात कनिष्ठ साहाय्यक म्हणून काम केले. तसेच काही वर्षे शिक्षिकेची नोकरी केली. यानंतर त्या हळूहळू राजकारणात आल्या.

त्यांचं लग्न श्यामचरण मुर्मू यांच्याशी झालं होतं, पण फार थोड्या अवधीच्या अंतराने दोन मुलांचा आणि पती श्यामचरण यांचा अकाली मृत्यू त्यांना पाहावा लागला. या काळात आलेल्या नैराश्यावर मात करण्यासाठी त्या प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थान, माउंट अबू यांच्या चळवळीकडे वळल्या. तेव्हापासून त्या ध्यानधारणेच्या नित्य उपासक आहेत. त्यांची मुलगी विवाहित असून भुवनेश्वर येथे राहते.

**राजनीतिक जीवन –** १९९७ मध्ये रायरंगपूर नगर पंचायत निवडणुकीत विजय मिळवून त्यांनी आपल्या राजनीतिक आयुष्याला सुरुवात केली. त्यांनी भाजपाच्या अनुसूचित जनजाती मोर्चाचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. तसेच भाजपाच्या आदिवासी मोर्चाच्या कार्यकारिणीच्या सदस्य राहिल्या.

रायरंगपूर विधानसभा मतदारसंघातून त्या भाजपच्या तिकिटावर दोनदा आमदार झाल्या. पहिल्या आमदारकीतच त्या नवीन पटनायक यांच्या मंत्रिमंडळात स्वतंत्र प्रभारासह राज्यमंत्री होत्या.

२००९ मध्ये त्या दुसऱ्यांदा आमदार झाल्या. त्यावेळेस त्यांच्याकडे स्वत:ची गाडी नव्हती. ओडिशातील सर्वोत्कृष्ट आमदार म्हणून मिळणारा 'नीलकंठ पुरस्कार'ही त्यांना मिळाला आहे. जवळजवळ १० वर्षे त्या भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्या होत्या. यानंतर त्यांची झारखंडच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली.

रायरंगपूर (ओडिशा) ते रायसीना हिल्स (राष्ट्रपती भवन) पर्यंत पोहोचलेल्या द्रौपदी मुर्मूंचं पूर्वाश्रमीचं जीवन मात्र संघर्षांने भरलेलं आहे.

राज्यपाल असतानाही त्या शाळा-कॉलेजांना भेटी देत राहिल्या. याच कारणामुळे कस्तुरबा शाळांची स्थिती सुधारली. २०१६ मध्ये त्यांनी विद्यापीठांसाठी लोकअदालत घेतली आणि विरोधाला न जुमानता कुलपती पोर्टल सुरू केलं. आदिवासी भाषांच्या अभ्यासाबाबत त्या सातत्याने सूचना द्यायच्या. याचा परिणाम असा झाला की विद्यापीठांमध्ये बऱ्याच दिवसांपासून बंद असलेल्या झारखंडमधील आदिवासी आणि प्रादेशिक भाषांच्या शिक्षकांची पुन्हा नियुक्ती होऊ लागली.

आपल्या राज्यपाल पदाच्या कार्यकाळात त्यांनी आधीचे स्वपक्षाचे भाजप आघाडीचे रघुवर दास सरकार आणि झारखंड मुक्ती मोर्चा आघाडीचे सध्याचे हेमंत सोरेन सरकार अशा दोन्ही सरकारांना आपल्या काही निर्णयांवर पुनर्विचार करण्याचा सल्ला दिला होता.

राष्ट्रपतीपदाची शपथ घेताना मुर्मूंजींनी काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या– १) त्यांनी सर्व देशवासियांचे आभार मानले. २) दि. २६ जुलै हा कारगिल विजयदिन आहे. त्यामुळे देशाच्या सैन्याला शुभेच्छा दिल्या. ३) मी स्वतंत्र भारतात जन्मलेली पहिली राष्ट्रपती असून स्वतंत्र भारतातील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी वेगाने काम करावे लागेल. असे त्या म्हणाल्या. ४) 'सबका प्रयास, सबका कर्तव्य' अमृतकाळ प्राप्तीचा मार्ग

२५ वर्षात या २ मार्गांवर पुढे जाईल. हे निश्चयाने सांगितले. ५) भारताची महानता लोकशाहीत आहे. त्यामुळे गरीब घरात जन्मलेली मुलगी सर्वोच्चपदी पोहोचू शकते. हे सत्य आहे. ६) हे जणू प्रत्येक गरिबाचे यश आहे. ७) मी शिक्षण घेण्याचा संकल्प सोडला नाही. कॉलेजमध्ये जाणारी मी माझ्या गावातील पहिली व्यक्ती होते. प्रत्येकाने शिक्षण घ्यावेच. ८) भारतातील महिलांचे यश मी सर्वतोपरी बघेन. ९) स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव संपन्न होत असताना ही संधी मिळाली हे माझे सौभाग्य आहे.

**कर्मयज्ञ –** द्रौपदीजी मुर्मू यांनी जणू आयुष्यभर कर्मयज्ञ केला आणि त्याचे सात्त्विक फळ त्यांना मिळाले. भारतीय घटनेनुसार राष्ट्रपती होण्यासाठी काही निकष आहेत. जसे– त्या व्यक्तीने वयाची ३५ वर्षे पूर्ण केली असावी, लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावी, त्या व्यक्तीला न्यायालयीन शिक्षा झालेली नसावी. भारताचे राष्ट्रपती देशाचे सर्वोच्च परंतु नामधारी शासनप्रमुख असतात. ते पंतप्रधानांची व नंतर त्यांच्या सल्ल्यानुसार इतर मंत्र्यांची नेमणूक करतात. संसदेने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी राष्ट्रपती करतात. महालेखापाल, निवडणूक आयुक्त, केंद्रीय लोकसेवेचे अध्यक्ष, सभासद बँकेचे गव्हर्नर, राज्यपाल यांच्या नियुक्त्या, संसदेचे अधिवेशन बोलावणे अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या राष्ट्रपतींना पार पाडाव्या लागतात. देशाच्या संचित निधीवर राष्ट्रपतींचे नियंत्रण असते, नवीन कराविषयी राष्ट्रपतींची संमती घ्यावी लागते, आणीबाणीचे अधिकारही राष्ट्रपतींना असतात. अशा सर्वोच्च पदी विराजमान झालेल्या मुर्मूंना कर्मयज्ञच करावा लागणार आहे. त्या आध्यात्मिक वृत्तीच्या असल्यामुळे ही कामगिरी त्या उत्तम बजावतील आणि हिंदूधर्म व संस्कृतीचे रक्षण करतील अशी अपेक्षा आपण ठेवूया.

शेवटी राष्ट्राचा उद्धार स्त्री वा पुरुष दोन्हींच्या रूपात तो परमात्माच करत असतो.

तेव्हा सच्छिल, सात्त्विक अशा नवीन राष्ट्रपतींकडून भारताचा ध्वज अजूनही उंच उभारला जावो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना!

* * *

## ऋचा अमित तुळजापूरकर हिचे सुयश!



**आदित्य मंडलमधील कार्यकर्ता अमित अरुण तुळजापूरकर आणि मुक्ता अमित तुळजापूरकर यांची ज्येष्ठ कन्या ऋचा हिने ९६.२% गुण मिळवून दहावीच्या परीक्षेत उत्तम यश मिळवले आहे. तिचे आदित्य प्रतिष्ठानच्या परिवाराकडून मन:पूर्वक अभिनंदन! आदित्यव्रती, कवयित्री, श्रद्धाश्री पुरस्कार विजेत्या सौ. रश्मी अरुण तुळजापूरकर यांची ती नात आहे. ऋचाला चित्रकलेची आवड असून ती उत्तम चित्रे काढते. तिला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!**



ऋचाने काढलेले चित्र

# बहुतांची अंतरे

**प्रतिष्ठानच्या वतीने दि. २२ मे २०२२ रोजी वैश्विक संत विद्यापीठाच्या भूमीवर 'महाविष्णुयाग' संपन्न झाला. त्यामध्ये जे सहभागी झाले ते एक सहस्त्र श्रद्धेय भक्त खरोखर भाग्यवान. सर्वांच्या सहकार्याने सोहळा उत्तम प्रकारे संपन्न झाला. त्यानंतर आलेल्या काही निवडक प्रतिक्रिया.**




### दि. २२ मे २०२२ - विष्णुयाग

सौ. अपर्णाताई, सा. नमस्कार

गेल्या आठवड्यात सर्वांगसुंदर असा विष्णुयाग संत भारतीच्या भूमीवर संपन्न झाला. आदरणीय गुरुदेव आणि तुमच्या नेतृत्वाने संपन्न झालेला हा यज्ञ आम्हाला प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. हे आमचे भाग्यच म्हटले पाहिजे. गुरुदेव आणि विवेकशास्त्री गुरुजींचे यथोचित असे वेळोवेळी केलेले विवेचन आणि यज्ञदेवतेचे मंत्र मनाला खूप प्रभावित करून गेले. मंत्राचे सामर्थ्य काय असते ह्याची प्रचिती आली. दिवसभर चाललेल्या ह्या यज्ञात खूप काही अनुभवायला मिळाले. त्रेतायुगात जसे यज्ञ होत असतील त्याचीच अनुभूती आली. चि. अरुंधती व तिच्या सख्यांनी केलेला अतिशय सुंदर, रोमांचकारी नृत्याचा आविष्कार, श्रीरामाने केलेल्या यज्ञाची व त्यात कुश-लव यांनी रामासमोर गायलेल्या रामायणाची आठवण देऊन गेला. यज्ञात केलेल्या निरनिराळ्या देवतांचे आवाहन, पूर्वजांची आठवण, पंचमहाभूतांचा सन्मान, पूजा तसेच गुरुजींनी उपस्थितांना करायला लावलेला सहभाग आंतरिक समाधान देऊन गेला. अरणीच्या साहाय्याने अग्नी प्रज्वलित करणे, यज्ञाची पूर्णाहूती, तसेच अतिशय सुंदर असे यज्ञाचे मांडलेले आयोजन बघायला मिळाले. नाहीतर हे आम्हाला कुठे बघायला मिळणार?

गुरुदेवांनी आठवण करून दिलेला बारा बलुतेदारांचा सहभाग यज्ञात कसा भरभराटीला जातो याची प्रचिती संपूर्ण सजवलेल्या यज्ञमंडप, यज्ञवेदी, सजावट, फुले, सर्वांची बसण्याची व्यवस्था, सर्व मंत्र आमच्यापर्यंत पोहोचवणारे उत्तम ध्वनिक्षेपक, उपस्थितांना उष्म्याचा त्रास होऊ नये म्हणून केलेली सोय, उत्तम प्रकारे केलेल्या आणि सर्वांना आग्रहाने वाढलेला नाश्ता तसेच जेवणाच्या रूपात दिलेला महाप्रसाद यांनी पुरेपूर दिली.

यज्ञात आपण उभयतांनी केलेला सन्माननीय

व्यक्तींचा यथोचित सन्मान यज्ञाला निश्चित पूर्णत्व देऊन गेला. खरोखरीच ह्या कलियुगात अशा प्रकारची अनुभूती यायला मिळणे हे आमचे भाग्यच आहे. हे केवळ आपल्यामुळे शक्य झाले. आपणास पुन:पुन्हा दंडवत.

या यज्ञात प्रकट झालेला अग्निदेव नक्कीच आमच्यावर कृपा करून आम्हाला संतभारतीच्या साकारलेल्या संकुलात घेऊन जाईल याची मला मनोमन खात्री आहे. आता पुढील उत्सुकता श्रीविष्णूच्या मंदिरातील प्रतिष्ठापनेची. तो योग लवकरच येईल ही खात्री आहे. आपण उभयतांना पुन्हा साष्टांग प्रणिपात.

– **सुहासिनी माधव कुबेर**, युएसए

आदरणीय गुरुदेव आणि सौ. अपर्णावहिनी

नमस्कार,

आम्ही सर्व ठाणेकर मंडळी सुखरूप घरी पोहोचलो. आमचा आजचा दिवस खूप आनंदात गेला. श्रीविष्णुयागासारख्या देवकार्यात सहभागी होता आले हे आमचे सर्वांचे भाग्य. खूप देखणा कार्यक्रम झाला.

– **अंजली बापट,** ठाणे

आदरणीय गुरुदेव व गुरु माउली

आपणाला भेटून खूप आनंद झाला. आपले कार्य खूप मोठे आहे. आज आपण आम्हाला यात सहभागी करून घेतले त्याबद्दल खूप छान वाटले एवढा मोठ्ठा कार्यक्रम नियोजन करून तो अतिशय उत्तम पद्धतीने पूर्ण करणे सोपे काम नाही. आपले कुटुंबीय व कार्यकर्ते बंधू यांनी खूप मेहनतीने काम केले. व्यवस्था अतिशय उत्तम होती. कामाचे नियोजन उत्तम त्यामुळे कार्यक्रम खूपच छान झाला. मी प्रथमच विष्णुयाग पाहिला. आम्हाला यात सहभागी होता आले त्याबद्दल खूप खूप आभार.

– **ज्योत्स्ना केळकर,** ठाणे

असं म्हणतात की पृथ्वीवर स्वर्ग अवतरतो, त्याचा अनुभव काल घेतला, स्वर्गीय आनंद... न भूतो न भविष्यति... आखीव-रेखीव नियोजन, खूप मेहनत, मा. गोडबोले शास्त्री यांचे मंत्र पठण, अरुंधती आणि तिच्या मैत्रिणींचे मनमोहक नृत्य, मन भारावून गेले. गुरुदेव आणि गुरुमाउली यांचे आशीर्वाद... धन्य झालो. उमाताई आणि डॉक्टरांचे खास आभार.

जय श्रीराम ।

– **स्वाती सुधीर ओलतीकर,** ठाणे

पूज्य गुरुदेव व सौ. अपर्णाताई

सादर दंडवत

कालचा विष्णुयागाचा सोहळा अत्यंत देखणा झाला. लक्ष्मीनारायणाचा फोटो, बाजूला दोन द्वारपाल समोर रांगोळीने सुशोभित केलेले पवित्र यज्ञकुंड हे सारे भव्यदिव्य वाटत होते. ऐरणीवर अग्नीनारायण साक्षात निर्माण झाल्याचे पाहून तर डोळ्याचे पारणेच फिटले. मंत्रघोषाने कान व मन तृप्त झाले. एकूण सारे खूपच छान कार्य झाले, पण आपल्या दोघांचे आशीर्वाद मला घेता आले नाहीत. त्यामुळे मन खट्टू झाले. तब्येतीमुळे मी फार वेळ थांबू शकले नाही. भगवान विष्णू आपणास भरभरून आशीर्वाद व यश देवो हीच त्याच्या चरणी प्रार्थना!

– **लता आंबेकर,** ठाणे

सोहळा अप्रतिम, सुंदर झाला. गुरुदेव व सौ. अपर्णाताई तुमचे सर्व कुटुंब आदित्य प्रतिष्ठानने खूपच छान कार्यक्रम केला. आम्ही खूप भाग्यवान आहोत.

– **नंदिनी बेंद्रे**

अतिशय दुर्मीळ श्रीविष्णुयाग श्री. व सौ. गुरुदेवांच्या सान्निध्यात अनुभवायला मिळाला हे पूर्वसंचितच. वेदमूर्ती श्री. गोडबोले शास्त्री व त्यांच्या

ब्रह्मवृंदाच्या खणखणीत आवाजात शास्त्रोक्त ऋचा, मंत्रोच्चार, अर्थपूर्ण विवेचन यज्ञमंडप दुमदुमून गेला. सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद!

**– गिरीश अंभईकर**

खरोखरच मी स्वत:ला भाग्यवान समजते कारण अशा दुर्मीळ श्रीविष्णुयागाला उपस्थित राहता आले तसेच आदरणीय गुरुदेवांना 'याचि देही याचि डोळा' पाहता आले आणि ऐकता आले. आनंददायी अनुभव होता. सगळ्यांना धन्यवाद!

**– स्नेहा नानिवडेकर**

सुप्रभात,

आम्ही सर्व संत भारतीच्या पवित्र वातावरणातून एक पवित्र ऊर्जा घेऊन परतलो. क्वचितच संपन्न होणाऱ्या श्रीविष्णुयागाची पवित्र संधी आम्हास लाभली. आ. गुरुदेव व गुरुमाउली अपर्णाताई यांच्यामुळे त्यांच्या हस्ते संपन्न झालेला हा याग आम्हाला एका तरल, शुद्ध व पवित्र आनंदाचा अनुभव देऊन गेला. आम्ही आदित्यव्रती ऋणी आहोत व खूप नशीबवान आहोत.

खरंय, 'याची देही याची डोळा' आपण प्रत्यक्ष लक्ष्मी-नारायणाचा कृपेने संपन्न केलेला याग आपण पाहिला. त्यांचे आशीर्वाद घेतले.

असा हा दुर्मीळ योग आम्हास प्रत्यक्ष अनुभवास मिळावा ही आपल्या पूर्वजांची पुण्याईच!

या यागाचे फलित संत भारतीच्या रूपाने लवकरात लवकर अस्तित्वात यावे ही भगवंताकडे प्रार्थना!

**– अनुराधा तळपदे**

इतका सुंदर कार्यक्रम झाला. अगदी नियोजनबद्ध. किती दिवस तयारी करावी लागली असणार. गोडबोले गुरुजींचे ताल सुरासहित केलेले मंत्र, ऋचा पठण तर फार सुंदर. आधी कधीच न ऐकलेले. कान तृप्त झाले.

**– मंजिरी दातार**

आदरणीय गुरुदेव आणि गुरुमाउली

कार्यक्रम अप्रतिम झाला. तुमच्यामुळे आम्हाला या कार्यात सहभागी होता आले त्याबद्दल खूप खूप आभार तुमचे.

**– कल्पना कासार**

कार्यक्रम खूप छान झाला. याग अतिशय उत्तम झाला. नियोजन अतिशय छान होते. प्रसाद उत्तम होता. खूप खूप समाधान झाले. धन्यवाद!

**– अलका निवंगुणे**

आ. गुरुदेव व सौ. अपर्णाताई, सादर नमन

दि. २२ मे चा श्रीविष्णुयाग सोहळा 'याची देही याची डोळा' अनुभवला. साठवला. निर्माणाधीन असणाऱ्या संत विद्यापीठाच्या पावन भूमीत, सुविधांचा अभाव असताना इतका भव्य, दिव्य, मनाला शांत आणि तृप्त करणारा सोहळा बघायला, अनुभवायला मिळाला हे आमचे भाग्य आणि त्या परमात्म्याची कृपा.

संपूर्ण अभ्यंकर कुटुंबीय, प्रतिष्ठानचे कार्यकर्ते आणि अन्य मदत करणारे सर्वजण, सगळ्यांनी शत प्रती शत योगदान दिलेले दिसले. नेटके नियोजन, कुठेही गडबड गोंधळ नाही, न्याहरी, प्रसाद यांची उत्तम योजना आणि सर्वांनी शांतपणे मनापासून दिलेल्या सर्व प्रकारच्या सेवा. खरोखर आयुष्यभर आनंद देईल, लक्षात राहील असा सोहळा. यासाठी कायमच आपले ऋणी राहू. आ. गुरुदेव आणि विद्वत् जनांनी सांगितलेल्या माहितीने आमच्या ज्ञानात भर ही घातली आणि भक्तिभाव ही वाढविला. तसेच लहान थोर, ज्या ज्या लोकांनी काही ना काही मदत, सेवा दिली त्या सर्वांना मान सन्मान, कौतुक, आदर सत्कार करून गौरविले ही गोष्ट फार आनंददायी वाटली. असेच सोहळे पुन:पुन्हा अनुभवायला मिळू दे हीच प्रार्थना. संत विद्यापीठाचे काम लवकरात लवकर पूर्ण होवो ही मनापासून शुभेच्छा!

**– सौ. अंजली अशोक मादुसकर,** वाई

## कीर्तनरंग –


गुरुदेव, विद्यावाचस्पती श्री. शंकर महाराजांचे कीर्तन म्हणजे शब्दातीत अनुभूती होती. गुरुदेवांची ओघवती वाणी, संत तुकाराम महाराजांच्या एक एक अभंगावरील निरूपण हा मनाला समृद्ध करणारा अनुभव होता. जितेंद्र आणि आदित्य यांच्या सुरेल आवाजातील अभंगांनी कान तृप्त झाले. **एका उच्च शिक्षित, संपूर्ण कुटुंबाने हिंदू संस्कृतीचा ठेवा असलेला संत वाङ्मयीन वारसा पुढच्या पिढीला देण्यासाठी जे कार्य हाती घेतले आहे ते आजच्या समाजातील एकमेवाद्वितीय असे उदाहरण आहे.**

– काळे+देशपांडे कुटुंबिय

**कीर्तन चांग कीर्तन चांग**
**होय अंग हरीरूप ।।१।।**
**प्रेमेछंदे नाचे डोले ।**
**हारपले देहभाव ।।धृ.।।**
**एकदेशी जीवकळा ।**
**हा सकळा सोयरा ।।२।।**
**तुका म्हणे उरला देव ।**
**गेला भेव त्या काळे ।।३।।**

'अहो कीर्तन चांगले आहे, चांगलेच आहे. कारण कीर्तन करणाऱ्याचे अंग हरीरूप होते. म्हणून कीर्तनात प्रेमाने, आनंदाने नाचावे, डोलावे मग तुमचा देहभाव आपोआप नाहीसा होईल. जीव हा एकदेशी म्हणजे मर्यादित असतो. पण हरी व्यापक, सर्वांचा सोयरा आहे. द्वैतभाव जाऊन, त्याचे भय गेले की तुकाराम महाराज म्हणतात तेव्हा फक्त देवच उरतो. अर्थात् अद्वैताची अनुभूति येते.'

## 'विष्णुयाग'



**दोन दशकी प्रवेश करता**
**केला गणेशयाग**
**चार दशकी प्रवेश होता**
**संपन्न विष्णुयाग ।।१।।**

**यज्ञ असे त्यागमय कर्म**
**गुरुदेव सांगती नित्य**
**तेचि करण्या संधी देई**
**प्रतिष्ठान आदित्य ।।२।।**

**गुरुदेवांसह वहिनी असती**
**सत्कार्यास्तव दक्ष**
**सहस्र आस्तिक व्यक्ती**
**विष्णुयागा साक्ष ।।३।।**

**विशाल भूमी संतपीठाची**
**विष्णुमंदिर पाया**
**मंत्रघोष आवाहन करतो**
**अग्निनारायण येण्या ।।४।।**

**ज्ञान, भक्ती अन कर्म**
**फळास ऐसे आले**
**यज्ञकुंडी नारायण अग्नी**
**प्रकट, प्रसन्न झाले ।।५।।**


**तेजाच्या त्या साक्षीने**
**केले पठण, हवन**
**पूर्णाहुतीच्या मंत्रोच्चारे**
**अंत:करण प्रसन्न ।।६।।**

**विष्णुयाग संदेश देतसे**
**सेवा, त्याग, संघटन**
**'राष्ट्र सर्वोपरि' म्हणतसे**
**सहभागी ते मन ।।७।।**

– सौ. रश्मी तुळजापूरकर

# वैश्विक संत विद्यापीठ भूमीवर श्रीमहाविष्णुयाग

## (वैशाख कृ. ७; रविवार, दि. २२ मे २०२२)



– सौ. प्राजक्ता नितीन जोशी





'मानवाच्या ऐहिक आणि पारलौकिक आकांक्षांचा उत्तम समन्वय साधणारी, सांस्कृतिक अनुबंध दृढ करणारी आणि मानवी जीवनाच्या अनेक अंगांना स्पर्श करणारी एक भव्य आणि दिव्य धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय संस्था म्हणजे यज्ञ होय.'

ही व्याख्या सार्थ करणारा महाविष्णुयाग सोहळा दि. २२ मे २०२२ रोजी आपण सर्वांनी वैश्विक संत विद्यापीठाच्या भूमीवर अनुभवला! एका यज्ञाच्या पार्श्वभूमीवर किती लोकांचे उदरभरण आणि चित्त तृप्त झाले याचा वस्तुपाठ म्हणजे हा महाविष्णुयाग होता. पूजनीय गुरुदेव व सौ अपर्णा काकूंनी या यागाचा संकल्प फार पूर्वीच केला असावा! साधारण २-३ महिने आधीपासून या यागाची तयारी सुरू झाली. दिवस व मुहूर्त शोधणे, गुरुजींच्या दिवसाचे आरक्षण करून ठेवणे या पहिल्या महत्त्वाच्या पायऱ्या पार पडल्या.

**यज्ञाची तयारी –** या पवित्र यागाला संपन्न करण्यासाठी तेवढ्याच ताकदीचे आचार्य मिळणे महत्वाचे होते! त्याप्रमाणे महाविष्णुयागाला वेदमूर्ती श्री. विवेकशास्त्री गोडबोले यांचे योगदान लाभले. साताऱ्यामध्ये उभारलेल्या श्रीकृष्ण यजुर्वेद वेदपाठ शाळेचे व्यवस्थापन आणि शिक्षण हे आचार्य विवेकशास्त्री गोडबोले पाहतात. आजपर्यंत पन्नासहून अधिक महायागांचे आचार्यपद संपूर्ण भारतभर, अमेरिका व युरोप प्रांतात देखील भूषविलेल्या विवेकजी शास्त्री गोडबोले यांना पंधरा पिढ्यांची कृष्ण यजुर्वेदी परंपरा लाभली आहे! वेदांचे जतन करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याला शृंगेरी व काञ्चीपीठाच्या शंकराचार्यांकडून पुरस्कृत करण्यात आले आहे. पूजनीय गुरुदेवांचे सखोल ज्ञान, अचूक मार्गदर्शन व वेदशास्त्री गोडबोले गुरुजींचे नेतृत्व यामुळे महाविष्णु याग अतिशय देखण्या स्वरूपात सादर झाला! म्हणूनच वरुणपूजनाचे वेळी वरुण राजाने देखील या महान कार्याची दखल घेत यागाच्या दिवशी मेघ गर्जनांसह पावती दिली, परंतु केवळ 'मी आलो आहे' एवढे सांगण्यापुरताच तो बरसला.

हा अद्भुत सोहळा अनुभवण्यासाठी सुमारे हजार लोक एकत्र आले होते. अर्थातच या सर्वांना विविध भागांमधून एकत्र आणणारा प्रधान दुवा म्हणजे आपले गुरुदेव व सौ. अपर्णा काकू आणि त्यांनी

केलेला महाविष्णुयागाचा संकल्प! 'यज्ञ म्हणजेच विष्णू अशी संकल्पना ब्राह्मण ग्रंथात आहे. यज्ञ विष्णुमय आहे आणि विष्णू यज्ञस्वरूप आहे. 'श्रीविष्णूप्रीत्यर्थ पुरुषसूक्ताच्या आधारे जो याग करतात त्याला महाविष्णु याग असे म्हणतात.'

दिवस निश्चित झाला आणि आम्ही सर्व कार्यकर्ते उत्साहाने तयारीला लागलो. त्यासाठी वेगवेगळ्या समित्या स्थापन केल्या गेल्या. पू. गुरुदेवांनी सांगितलेल्या सर्व मुद्यांवर सर्व स्तरावरून काम सुरू झाले. यात मुहूर्त काढणे, आचार्य श्री. गोडबोले गुरुजी व त्यांचे सहकारी यांच्याशी बोलून त्यांची तारीख आरक्षित करणे, यागासाठी लागणारी सर्व उत्कृष्ट दर्जाची सामग्री जमा करणे, वेगवेगळ्या प्रांतांमधून येणाऱ्या पाहुण्यांच्या वाहतुकीची व्यवस्था करणे, यागाच्या दिवशी महाप्रसाद, पाणी, स्वच्छतागृहे, वाहनतळाची व्यवस्था, मंडप, रांगोळी, यज्ञासाठी लागणारी जागा इ. अनेक गोष्टींच्या व्यवस्थापनाची लगबग सुरू झाली. या पवित्र यागासाठी अनेक लोकांचे विविध स्तरावर सहकार्य लाभले, खरंतर आपल्या सद्गुरूंनी ते आपल्याकडून करवून घेतले असेच म्हणायला हवे!

सौ. अपर्णा काकू व संपूर्ण अभ्यंकर कुटुंबीय यज्ञाच्या तयारीसाठी दिवस-रात्र काम करत होते. पू. गुरुदेव व सौ. अपर्णा काकू तर यज्ञाच्या आधी अनेक दिवस सतत पुणे ते लोणावळा असा प्रवास करत होते. मंडप उभारणारे कंत्राटदार, स्थानिक लोकांनी करावयाची कामे, यज्ञाच्या दिवशी लागणारी व्यवस्था, गुरुजींनी सांगितलेल्या सूचनांप्रमाणे यज्ञाच्या जागेवरील मांडणी, जागेवरील सर्व कामांची धुरा पू. गुरुदेव व सौ. अपर्णा काकूंनी आपल्या नेतृत्वाखाली यथोचित सांभाळली. त्यांच्या बरोबरच अनेकदा कामांची व्यवस्था पाहण्यासाठी सीए जितेंद्रदादा व डॉ. आदित्यदादा संत भारतीच्या जागेवर जात होते, तेथील लोकांशी समन्वय साधत होते. गुरुजींनी सांगितलेली यज्ञाची जागा व यज्ञकुंड तयार करण्यासाठी, कार्यालयातील स्वच्छता, यज्ञाच्या





मंडपाची स्वच्छता ही महत्त्वाची कामे तेथील व्यवस्थापक रविन्द्र शिंदे यांनी उत्तम पार पाडली. संत भारतीच्या जागेवर राहणाऱ्या मामा-मामी व कुटुंबीयांनी खूप मदत केली.

तेथील ब्राह्मण मंडळाने काही आर्थिक सहकार्यही केले. तसेच मांडव व भोजन व्यवस्था यासाठी तेथील उत्तम कंत्राटदारांना सहभागी केले. श्री. कुटे यांनी उत्तम मांडव घातला. ब्राह्मण मंडळाच्या सदस्या मेधा वैद्य व शरयू कुलकर्णी यांनी खूप वारा असूनही उत्तम रांगोळी घातली. श्रीमती ॲड. खिरे यांनी उत्तम केटरिंग कसे होईल हे पाहिले. श्री. सुरेशजी साखवळकर यांचे अध्यक्षेतेखाली एक अस्थायी समिती स्थापन करण्यात आली. सुरेशजी तळेगावातून लोकप्रिय साप्ताहिक चालवतात. त्यांचा



लोकसंग्रह मोठा असून त्यांच्या शब्दाला मान आहे. त्यांनी या समितीला मार्गदर्शन करून उत्तम योगदान दिले. त्यांचेबरोबरच ॲड. नागेश, श्री. नंदकुमार ऊर्फ बाबूजी वाळंज, श्री. राम मत्ते, श्रीमती अनुराधा तळपदे, श्री. रघुवीर व सौ. उर्मिला ओक, श्री. आदित्य अभ्यंकर, श्रीमती उर्मिला सडेकर, श्री, रमणलाल आळतेकर, श्री. व सौ. विशाखा बिळगी यांनीही उदार देणग्या देऊन यज्ञ संपन्न होण्यासाठी मदत केली. याव्यतिरिक्त हजार, पाचशे देणारे असंख्य भक्तजन आहेत. आलेले कोणीही रिकाम्या हाताने आलेच नव्हते. श्रीविष्णूंप्रती नितांत श्रद्धा घेऊन आले होते. यावेळेला यज्ञाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लोणावळा, तळेगाव, मावळ येथील स्थानिक लोकांनी अतिशय उत्स्फूर्तपणे योगदान दिले. प्रशांत पुराणिक यांनी स्थानिक समन्वयक म्हणून उत्तम काम केले. त्यांचा व तेथील ग्रामस्थांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

**यज्ञस्थळी श्रद्धेय भक्तांचे आगमन –** यज्ञाच्या दिवशी लोकांना मुंबई व पुणे येथून संत भारतीच्या जागेवर आणण्यासाठी बसेसची व्यवस्था गुरुदेवांचे पुतणे श्री. आशिष अभ्यंकर यांनी केली. ठाणे, दादरवरून प्रत्येकी १ बस व पुण्याहून २ बसेस यज्ञाच्या दिवशी आयोजित करण्यात आल्या होत्या. प्रत्येक बसमधून सुमारे ५० ते ६० लोकं यज्ञ स्थळी व्यवस्थित पोहोचणे, त्यांच्या सोबत संवाद करणे, त्यात आयत्या वेळेस होणारे बदल याची सर्व जबाबदारी सौ. मधुरा वहिनी अभ्यंकर हिने उत्तमरीत्या पार पाडली आणि सर्वजण यज्ञाच्या जागी वेळेवर येऊन पोहोचले.

एखादा सोहळा देखणा दिसण्यासाठी उत्तम प्रतीचे बॅनर्स लागतात जेणेकरून त्या सोहळ्याचा दृश्य प्रभाव (visual effect) लोकांच्या मनावर प्रस्थापित करता येतो. महाविष्णु यज्ञाच्या वेळी प्रभू श्रीरामचंद्र, भगवान श्रीकृष्ण व लक्ष्मी नारायण यांचे मोठे प्रभावी फोटो तसेच चार दिशांना उद्देशून चारही वेदांच्या नावांचे मोठे फोटो तयार करण्यात आले. या सर्व कामाचे नेतृत्व सौ. आरती वहिनीने सौ. अपर्णा काकूंच्या मार्गदर्शनाखाली केले. यागासाठी लागणाऱ्या सर्व साहित्याची जबाबदारी मी आणि आदित्य मंडळ कार्यकर्त्यांनी पार पाडली. यासोबत सर्व गुरुजींसाठी घरी बनवलेला प्रसाद लागणार होता! त्याची सर्व जबाबदारी ज्येष्ठ आदित्यव्रतींनी वाटून घेतली त्यामुळे सर्व गुरुजींना प्रसाद वाढण्याचे पुण्य जमा करता आले!

यागाच्या दरम्यान म्हटल्या जाणाऱ्या सर्व स्तोत्रांची म्हणजेच पुरुष सुक्त, विष्णुसहस्रनाम, श्रीसूक्त इ. एक छोटी पुस्तिका ‘श्रीविष्णुलक्ष्मी वंदना’ आदित्य प्रतिष्ठानच्या प्रकाशक मंडळाने अत्यल्प कालावधीत तयार करून सर्व उपस्थितांना उपलब्ध करून दिली त्यामुळे गुरुजी पुरुषसूक्त म्हणताना सर्वजण एकाग्रतेने श्रवण करत होते.

**आचरणातून शिकवण –** यज्ञाच्या प्रसंगी पू. गुरुदेव व सौ. अपर्णा काकू जरी त्या यज्ञकुंडाच्या जागी उपस्थित होते तरी त्यांचे बारीक लक्ष सर्व व्यवस्थेवर होते. एकाच वेळेस इतक्या सर्व जबाबदाऱ्यांचा समन्वय घडवून आणणे, कुठेही कमतरता पडणार नाही हा दूरदृष्टीचा विचार आधीपासून करून ठेवणे व त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांची बल-शबल स्थाने ओळखून त्यांना अचूक जबाबदाऱ्या सोपविणे, सहाशे ते सातशे जणांना महाविष्णु यागाचे पुण्य मिळवून देणे व त्यायोगे संघटन अधिक बळकट करणे, ईश्वरी कृपा लाभलेल्या संत विद्यापीठाच्या भूमीवर सर्वांना एकत्र आणून पुढील उन्नत होत जाणाऱ्या कार्यासाठी प्रेरित करणे इ. सर्व अद्भुत कार्ये पू. गुरुदेव व सौ. अपर्णा काकू या यागाच्या निमित्ताने घडवून आणत होते! तसेच यज्ञासाठी उपस्थित असलेल्या प्रमुख पाहुण्यांची व्यवस्था नेटकी आहे ना यावर देखील त्यांचे लक्ष होते. प्रत्येकजण आपापला खारीचा वाटा देत होते आणि त्यातूनच हा याग अतिशय उत्तमरीत्या सफल संपूर्ण झाला!

**प्रत्यक्ष यागाचा सोहळा –** सर्व भक्त जमल्यावर

योजनेप्रमाणे सर्वांना श्रीसूक्त व पुरुष सूक्ताची पुस्तिका देण्यात आली. नाम लावला गेला. सनईच्या मंगल सुरामधे देखणा मंडप पवित्र झाला होता. प्रत्येकाच्या हातामध्ये यज्ञसूत्र बांधले गेले आणि ९.३० वाजता गुरुदेवांनी यज्ञाची माहिती सांगून यज्ञाला प्रारंभ झाला. सूत्रसंचालन डॉ. आदित्य अभ्यंकर करत होते. गुरुदेव दाम्पत्य सर्वांच्या वतीने यज्ञासाठी स्थानापन्न झाले आणि मग गणेशपूजन, वरुणपूजन, मूर्तीपूजन, नांदीश्राद्ध हा विधी यथाशास्त्र संपन्न झाला.

यानंतर गुरुदेवांची व सौ. अपर्णाताईंची नात चि. अरुंधती अभ्यंकर आणि तिच्या तीन सख्या यांनी 'नमो हरि नारायण' या अभंगावर अत्यंत देखणे नृत्य सादर केले. जणू यज्ञ निर्विघ्न पार पडावा यासाठी श्रीविष्णूला आवाहन केले आणि त्यानंतर प्रत्यक्ष यागाला सुरुवात झाली.





१००० वेळा पुरुष सूक्ताचे आवर्तन होणार होते आणि १०१ वेळा श्रीसूक्ताचे आवर्तन होणार होते. हवनासाठी तीळ, लाह्या, फुले, तूप, पायस हे मोठ्या प्रमाणात तयार होते. त्याप्रमाणे शुद्ध व अत्यंत सुरेल असे हे पाठ म्हटले गेले.

या यज्ञकार्याचा कळस म्हणजे सर्व वेदपाठी ब्राह्मणांनी मिळून केलेले ऋचा पठण व पुरुषसूक्ताची आवर्तने! होमात अग्नीची स्थापना करताना पवित्र लाकडापासून तयार केलेली 'अरणी' वापरली गेली. हा अग्नी अरणीवर प्रज्वलित करताना बरीच ताकद लागते. हा अनुभव फारच क्वचित घ्यायला मिळतो त्यामुळे या प्रसंगी सर्व जमलेले लोक अगदी चातकासारखी तो अग्नी प्रज्वलित होण्याची वाट पाहत होते. शेवटी थोड्या प्रयत्नांनी तो अग्नी प्रज्वलित झाला.

त्यानंतर प्रथम पुरुषसूक्तातील प्रत्येक ऋचेने आहुती दिल्या गेल्या, त्यानंतर पूर्णाहुती संपन्न झाली.





यानंतर सर्वजण ज्याची वाट पहात होते ते म्हणजे सामूहिक विष्णुसहस्रनाम पठणाची. कारण कोरोना कालखण्डात सौ. अपर्णाकाकूंनी विष्णुसहस्रनामाचे वॉटसअॅप ग्रुप तयार केले व

सर्वांना दररोज नाम म्हणण्याची सवय लावली. त्यातील बहुसंख्य लोक विष्णुयागासाठी आले होते. त्यामुळे सर्वांनी एकमुखाने व सामुहिक असे सहस्रनामाचे पठण तन्मयतेने उत्साहात केले. कृतार्थ भावना मनात जागृत झाली.

या सर्व कार्याच्या दरम्यान वेदमूर्ति गोडबोलेशास्त्री प्रत्येक विधीचे अर्थ समजावून सांगत होते. पू. गुरुदेव काही गोष्टींचा उलगडा करून लोकांशी सुसंवाद साधत होते त्यामुळे मंडपातील प्रत्येक जण अतिशय तन्मयतेने या यागात सहभागी झाला होता. ऋचा पठणाने आसमंतात एक प्रचंड सात्त्विक ऊर्जा भरली होती.







**एक आगळा वेगळा उपक्रम –** श्री. जितेन्द्रदादा अभ्यंकर यांच्या संकल्पनेतून एक वेगळा उपक्रम राबवला गेला तो म्हणजे 'वृक्षदान'. संत विद्यापीठाची भूमी हरित व्हावी म्हणून त्या दिवशी ९५ जणांनी वृक्षदान केले. प्रत्यक्ष रोपे लावली आणि निसर्ग यज्ञात एक समिधा दिली.





**सांगता –** यज्ञाचा महाप्रसाद ग्रहण करून सर्वजण अगदी तृप्त होऊन सायंकाळी आपापल्या स्थानी परत गेले. या यागाच्या निमित्ताने अनेक जणांनी पुण्यदान केले. आपल्या संत विद्यापीठाच्या उभारणीच्या अनुषंगाने हा याग आत्यंतिक महत्त्वाचा होता. आता या यागाची पुण्याई संतभारतीचे काम लवकरात लवकर पूर्णत्वाच्या दिशेने जायला नक्की मदत करेल यात शंकाच नाही!



# श्रीमहाविष्णुयागामध्ये पंचमहाभूतांचे सहकार्य

– सौ. अपर्णाताई अभ्यंकर

जेव्हा दि. २२ मे २०२२ रोजी यज्ञ संपन्न झाला तेव्हा समाधानाचे बीज सर्वांच्या मनात घट्ट रुजले होते. महाविष्णुयाग नेहमी केला जात नाही. त्याचा व्याप मोठा असतो. आपण हा महाविष्णुयाग काही विशिष्ट हेतूने संपन्न केला.

पहिले कारण म्हणजे कोरोना च्या कालखंडात ज्या सर्वांनी विष्णुसहस्रनाम पाठ केले, म्हटले, त्या सर्वांना विष्णू यागाच्या ठिकाणी ते म्हणावे आणि भगवंताप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करावी अशी इच्छा मनात होती.

दुसरे अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे ज्या ठिकाणी आपण विष्णु मंदिर करणार आहोत त्याचा भव्य पाया आता तयार झाला आहे. तेथे श्री विष्णूना आवाहन करून लवकर मंदिर होऊन त्यामध्ये आपण अवतीर्ण व्हा असे आवाहन भगवंतांना करावयाचे होते.

आपण म्हणतो की पंचमहाभूतात्मक अशी ही सृष्टी आहे. यज्ञाच्या वेळी याचाच प्रत्यय जवळून आपल्याला आला.

पहिले तत्त्व पृथ्वी. ज्या पृथ्वीवर आपण मंदिराचा ४०००० चौरस फुटाचा पाया बांधला, ती जागा अभिमंत्रित केली, त्या रूपाने पृथ्वीचे आशीर्वाद लाभले.

दुसरे तत्त्व 'आप' म्हणजे पाणी. सरोवराच्या रूपाने ते तेथे होतेच पण सर्वांच्याच मनात पावसा विषयी धाकधूक होती. मात्र गुरुदेवांना विश्वास होता की यज्ञ निर्विघ्न पार पडणार. यज्ञामध्ये वरुणाला आवाहन केले तेव्हा जणू शुभाशीर्वाद म्हणून पावसाचे चार थेंब आले आणि काळे ढग आले तसे विरून गेले. मंत्रसामर्थ्य काय असते याचा आपण अनुभव घेतला.

तिसरे तत्त्व म्हणजे तेज. यज्ञस्थली अरणीने घर्षण करून आपण अग्नीला आवाहन केले आणि तेज प्रगट झाले. तो सोहळा वेगळी अनुभूती देऊन



गेला. प्रज्वलित अग्नी जोजवत, फुलवत गुरुजींनी यज्ञकुंडात ठेवला आणि मग तो तेथे तेजाने प्रकट झाला.

चौथे तत्त्व वायू तत्व. ते तर सतत अत्यंत सौम्य रूपात रुंजी घालत होते. त्यामुळे उकाडा सुसह्य होत होता.

पाचवे तत्त्व म्हणजे आकाश. संपूर्ण यज्ञावर जणू आकाशाने मंडप घातला होता इतके ते वातावरण शुद्ध व पवित्र होते.

आपण सर्व भगवंताचे भक्त या कार्यक्रमाला उत्साहाने आणि आनंदाने तसेच शिस्तीने आलात आणि हा याग तुमच्या सर्वांच्या जवळ जवळ सातशे लोकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यज्ञाचा अनुभव दिव्य असतो. त्याचे वर्णन नाही करता येत. तो प्रत्यक्ष घ्यायचा असतो. तुम्ही सर्वजण भाग्यवान आहात की तुम्ही तो अनुभव घेतला.

अनेकांनी वृक्ष लावले. वृक्ष म्हणजे जीवन. त्यांच्या रूपाने ही यज्ञस्मृती कायम जपली जाईल.

**आता आपण सर्वांनी विष्णुमंदिरासाठी कामाला लागायचे आहे. यज्ञ स्थळी सर्वांनी भरभरून श्रद्धाधन दिले. अजूनही देत आहात. असेच देत राहिलात तर आपले मंदिर लवकर उभे राहील अशी माझी श्रद्धा आहे.**

शुभम् भवतु ।

* * *

# धन्य धन्य शिवराय

## (दि. ६ जून २०२२)

दि. ६ जून २०२२ या शिवराज्याभिषेक दिनी गुरुदेवांनी सुपुत्रांसह हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, पुणे येथे सादर केला. ३४८ वर्षांपूर्वी राज्याभिषेकाचा आनंद लोकांनी कसा अनुभवला असेल याची प्रचिती आली. अवघे वातावरण शिवमय झाले.




मुळात शिवचरित्र ही सोन्याची लगड! त्याला गुरुदेवांच्या वक्तृत्वाचा, काव्याचा स्पर्श, अप्रतिम संगीत, जितेंद्र, आदित्यचा समर्थ आवाज यांनी त्या सोन्याच्या लगडीला सुगंध प्राप्त झाला.

यातील प्रत्येक गाणे वैशिष्ट्यपूर्ण आहे. एकनाथांनी 'गोंधळा'च्या रूपाने देवीला घातलेले साकडे, त्यानंतर शिवजन्माचे गाणे अप्रतिम ढंगाने सादर होते. पोवाडा ऐकल्यावर श्रोत्यांची उस्फूर्त अशी दाद मिळते. महाराजांनी रोहिडेश्वराला घेतलेली शपथ, 'त्रिशूल दे मज' हे शंकरा रागातील गाणे श्रोत्यांना अंतर्मुख करते. सावरकरांची आरती, पं. हृदयनाथ मंगेशकरांची चाल अष्टसात्विक भाव जागृत करते. तू हो स्वातंत्र्याचा सूर्य- वेगळीच प्रेरणा मिळते. प्रत्येक तरुणाने ऐकावे असे हे काव्य आहे. कवी कुसुमाग्रजांनी अजरामर काव्य निर्माण केले– 'वेडात मराठे वीर दौडले सात' कविराय भूषणांचे काव्य 'वृन्दकहाँ...' शिवरायांचे राज्य साकार झाल्यावर समर्थ रामदासांना झालेला आनंद गुरुदेवांच्या वाणीतून ऐकणे हे केवळ स्वानुभूतीचे लेणे! कारण तेच शिवरायांचे गुरु होते हे त्रिकालाबाधित सत्य आहे! डॉ. आदित्य यांनी सादर केलेले औरंगजेबाचे मनोगतही श्रोत्यांची दाद घेऊन जाते आणि 'श्रीशिव छत्रपती झाले' या भैरवीने आनंदाच्या परमोच्च बिंदूला आपण पोहोचतो.

अवघ्या श्रोत्यांनी हा सुगंध भरभरून घेतला, तृप्ती अनुभवली! प्रेरणादायी शिवचरित्र हृदयात धारण केले. सर्वांनी हा अनुभव अवश्य घ्यावा. पुनश्च कार्यक्रम झाला तर तो ऐकून किंवा सीडी/डीव्हीडी ऐकून! एकदा नव्हे पुन:पुन्हा! पुढच्या अनेक वर्षांसाठी हा कार्यक्रम एक आवश्यक आणि सात्त्विक ऊर्जा प्रदान करता झाला. हा अनुभव म्हणजे आयुष्यातील मनोज्ञ आठवणींच्या कुपीतील सुवर्णपान! श्रोत्यांना धन्य धन्य करणारे! शिवप्रेम, राष्ट्रभक्ती, उमलविणारे! दूरदर्शित्व शिकविणारे! प्रतिष्ठानच्या आणि गुरुदेवांच्या सदैव ऋणात राहावे अशी भावना जागवणारे!

सुविख्यात प्रमोटर-बिल्डर शिवकुमार जावडेकर यांनी लिहिले आहे– 'कालचा कार्यक्रम अतिशय सुरेख झाला. मी तर अक्षरश: भारावून गेलो. आपल्याबरोबर आमचा ऋणानुबंध आहे, हे मी आमचे भाग्य समजतो.'

**– सौ. रश्मी तुळजापूरकर**

# वैश्विक संत भारती – एक दिव्य संकल्प



– अभय भंडारी, विटा



पुणे-मुंबई द्रुतगती मार्गालगत लोणावळ्याच्या अलीकडे असलेल्या देवळे-औंढोली गावी श्रीविष्णुयाग संपन्न झाला.

विद्यावाचस्पती श्री. शंकरराव अभ्यंकर यांच्या दुर्दम्य इच्छाशक्ती आणि अतुलनीय योगदानाने तिथे भव्य वैश्विक संत विद्यापीठ आकाराला येत आहे.

हे ईश्वरी कार्य आहे, याबद्दल यत्किंचितही संदेह नाही. आपला भारत ही परमपावन देवभूमी आहे. हे सत्य आपल्या साधू, संत, दार्शनिकांनी त्यांच्या प्रत्यक्ष जीवन आणि उपदेशातून समाजमनावर बिंबवण्यासाठी आपापले जीवन समर्पित केले.

भारताच्या अनुकूल आणि अत्यंत प्रतिकूल काळातही संतांनी धर्मरक्षणाचे कार्य अविरतपणे केले. हिंदू धर्म असे निक्षून सांगतो, की प्रत्येक जीव हा अव्यक्त ब्रह्म आहे.

स्वाभाविकच ईश्वरी दिव्यता मनुष्यातही अंशरूपाने विद्यमान आहेच, पण मनुष्य अज्ञान आणि इंद्रियजन्य भोगलोलुपतेच्या दुष्टचक्रात अडकलेला असल्याने त्याला याची जाणीव होत नाही. परिणामी तो आणि एकूणच संपूर्ण समाज अनेक प्रकारच्या दारुण दु:खाने अव्याहतपणे होरपळून निघतो. यावर उपाय काय? याचे गहन चिंतन भारतीय परंपरेत झाले आहे.

ज्या प्रमाणात मनुष्याच्या अंतरंगातील सुप्तावस्थेत असलेले ईश्वरी तत्त्व व्यक्त होईल, त्या प्रमाणात मानवी जीवनातील दैन्य, दु:ख, दारिद्र्य, अज्ञान, असंस्कृतपणा नाहीसा होईल. म्हणूनच ज्ञानेश्वर माउली उद्घोषणा करतात, 'आनंदाचे आवारू मांडू या जगी', तुकोबाराय कळवळून म्हणतात, 'बुडते हे जन देखवेना डोळा', समर्थ रामदासांनी आनंदवन-भुवनाचे स्वर्गीय वर्णन केले, संत मीराबाई ठामपणे म्हणतात, 'पायो जी मैने रामरतन धन पायो ।'

परकीय रानटी असंस्कृत आक्रमकांनी सारा भारत विध्वंसाने हताश करून टाकल्यावर संत एकनाथ महाराज आदिशक्तीचे कळवळून 'बये दार उघड' अशा शब्दात आवाहन करतात. 'जगन्माते,

तुझी तेजस्विता, सामर्थ्याची प्रचिती रोकडेपणाने आता या हतवीर्य झालेल्या हिंदू समाजाला येऊ दे.'

भारतावर परकीयांनी लादलेल्या पाशवी पारतंत्र्यात संतांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत धर्म टिकवून ठेवला. समाजाची ईश्वरावरील श्रद्धा अविचल राहावी, यासाठी संतांनी सर्वस्व पणाला लावले. याचा परिणाम म्हणून आपण आपल्या सर्व सांस्कृतिक, धार्मिक परंपरा बाराशे वर्षांच्या पारतंत्र्याच्या प्रदीर्घ काळातही टिकवून ठेवू शकलो.

आता आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना आपल्या समस्या वेगळ्या आहेत. समाजात ऐहिकतेच्या प्रभावाने निर्माण झालेली सुखासीनता, व्यसनाधीनता, लुप्त होत चाललेले शारीरिक, मानसिक स्वास्थ्य, भावनिक अस्थिरता, डळमळीत होणारी श्रद्धा, अमर्याद लालसा या आपल्या आजच्या समस्या आहेत.

या सर्व समस्यांवर एकच उत्तर आहे, ते म्हणजे समाज सुसंस्कृत करणे. यासाठी लागणारे सारे आध्यात्मिक संचित संतांनी आपल्यासाठी मागे ठेवले आहे. ते आपल्या प्रामाणिक आचार विचारातून आपण समाजापर्यंत पोहोचवण्याचे कार्य संतांच्या मार्गाचे अनुसरण करीत साधायचे आहे.

**हे विराट राष्ट्रकार्य साध्य करण्यासाठी भारतातील सर्व संतांच्या वाङ्मयाचे अध्ययन करणे, ते तरुणांच्या जीवनात संस्काराने उतरवणे व पुढे अशा हजारो तरुणांनी आपला संपूर्ण समाज एखाद्या पवित्र व्रताचा आचार म्हणून संस्कारित करून भारतात पुन्हा रामराज्य अवतरित करणे अशी ध्येयनिष्ठ वाटचाल अपेक्षित आहे.**

**हे भव्य उदात्त ध्येय डोळ्यासमोर ठेवून गुरुदेव शंकरराव अभ्यंकरांनी वैश्विक संतपीठ स्थापन करून या पवित्र कार्याला प्रारंभ केला आहे. आता जरुरी आहे समाजाने या उपक्रमात योगदान देण्याची! आपल्या समाजाचा चेहरा मोहरा बदलून टाकण्याचा हा दैवी संकल्प आहे. लवकरच हा प्रकल्प मूर्त स्वरूपात साकारेल. शेकडो धर्मनिष्ठ, सश्रद्ध, ध्येयनिष्ठ युवक, युवती या संत विद्यापीठात ज्ञान व संस्कार ग्रहण करून समाजात हे विचार रुजविण्याचे मौलिक कार्य करतील.**

आपल्या भारतीय संस्कृतीत ऐहिक आणि पारमार्थिक अशी जीवनाच्या दोन्ही क्षेत्रातील परम वैभव आणि कल्याण साधण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून जीवनाचे चिंतन केले आहे.

स्वामी विवेकानंद म्हणतात, 'या विश्वात फक्त वैश्विक कल्याणाची कामना करणारी हिंदू जीवनदृष्टीच शांतता निर्माण करू शकेल. साऱ्या विश्वातील मानवाच्या परम कल्याणाची जबाबदारी नियतीने हिंदू समाजावर सोपवलेली आहे.'

**स्वामीजींनी उद्घोष केलेल्या या पवित्र विचाराशी सुसंगत अशी ही वैश्विक संत विद्यापीठाची संकल्पना आहे.** या पवित्र कार्याला गुरुदेवांनी प्रारंभ केला आहेच, या कार्यात आपले जे ही शक्य असेल ते योगदान देऊन या गौरवशाली दिव्य मार्गावर वाटचाल करू या.

* * *


उत्तिष्ठत! जाग्रत!! प्राप्य वरान् निबोधत!!!

– स्वामी विवेकानंद



# श्रीरंग कलादर्पण कला प्रशिक्षण संस्था
# रंगावली प्रदर्शनाचे गुरुदेवांच्या हस्ते उद्घाटन

## दि. २७ मे २०२२








श्रीरंग कलादर्पण कला प्रशिक्षण संस्था यांच्या वतीने राजा रवी वर्मा आर्ट गॅलरी येथे रंगावली प्रदर्शन भरवले होते. याचे उद्घाटन गुरुदेव अभ्यंकरांच्या शुभहस्ते झाले. या प्रदर्शनात गुरुतत्त्वाशी संबंधित श्रीगुरुदेवदत्त, श्रीस्वामी समर्थ महाराज, श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती महाराज, श्रीशंकर महाराज, श्रीगजानन महाराज, महाराष्ट्रातील पंचतत्त्वे, श्री बाळूमामा आदींचे रांगोळीतून दर्शन घडविण्यात आले. रांगोळी कलेच्या माध्यमातून घडवलेले श्रेष्ठ अशा आध्यात्मिक व्यक्तींच्या दर्शनाचे गुरुदेवांनी कौतुक केले.

प्रतिवर्षी वेगळा विषय घेऊन त्यावरील कलाकृतींचे हे प्रदर्शन भरवण्यात येते. गुरुदेवांनी संस्थेचे संचालक श्री. अक्षय शहापूरकर आणि त्यांचे साथीदार यांचेविषयी 'तुमच्या बोटात साक्षात सरस्वती आहे' असे गौरवोद्गार काढले व त्यानंतर रांगोळी कलेचा इतिहास सांगितला.

श्री. अक्षय शहापूरकर यांनी अनेक प्रकारच्या रांगोळ्या काढणारे कलावंत घडविले आहेत. प्रसंगविशेष, पाण्यावरील रांगोळ्या, प्रतिबिंब रांगोळ्या, न पुसल्या जाणाऱ्या रांगोळ्या, व्यक्तिविशेष असे प्रकार पाहून मन अचंबित होते. प्रतिष्ठानच्या 'धन्य धन्य शिवराय' या कार्यक्रमात त्यांनी रांगोळी रेखाटली होती.

# स्वा. सावरकर चिंतनसूत्रे
# ग्रंथ प्रकाशन

### दि. ३ जुलै २०२२





विद्यावैभव प्रकाशन, फलटण यांच्या वतीने डॉ. शरद कुंटे यांनी लिहिलेल्या 'एक द्रष्टा महापुरुष - स्वा. सावरकर चिंतनसूत्रे' या ग्रंथाचे प्रकाशन आ. गुरुदेव अभ्यंकरांच्या शुभहस्ते, न्यू इंग्लिश स्कूल सभागृह, टिळक रोड, पुणे येथे संपन्न झाले. यावेळी बोलताना गुरुदेव म्हणाले, 'सावरकरांचे व्यक्तिमत्त्व अनेक पैलूंनी नटलेले होते. त्यांनी अजरामर वाङ्मयाची निर्मिती केली. हिंदू धर्म, हिंदुत्व, हिंदू राष्ट्र, राष्ट्र उभारणी, शिक्षण, इतिहास, अस्पृश्यता निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन, भाषाशुद्धी या विषयावरील सावरकरांची सूत्रे आजच्या कालाशी अनुबंध जोडणारी आहेत. विज्ञानवादी असलेले सावरकर पूर्णत: आस्तिक होते हे लक्षात ठेवा. भारत हे विश्वकल्याणाचा विचार करणारे एकमेव राष्ट्र आहे. जगात कितीही बुद्धिवादी असले तरी त्यांना हिंदुत्वाकडे वळावे लागेल.

बुद्धिमत्तेचा उपयोग स्वार्थासाठी न करता स्वामी विवेकानंद, लो. टिळक, स्वा. सावरकर यांच्याप्रमाणे राष्ट्र उद्धारासाठी करणे आवश्यक आहे.' गुरुदेवांच्या या विचारांना उपस्थित श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजरात मानवंदना दिली.

प्रकाशक बकुळ पराडकर, प्राचार्य रवींद्र येवले आणि लेखक डॉ. शरद कुंटे व्यासपीठावर उपस्थित होते. लेखकांनी ६५६ पृष्ठांच्या ग्रंथात सावरकरांची २२५ चिंतनसूत्रे दिली असून त्यावर वर्तमान-भविष्याचा वेध घेणारे मार्मिक भाष्य केले आहे.

# वारकरी कीर्तन
# ‘पांडुरंग जाणे भाव ।’



– सौ. सुलभा श्रीकांत आठवले



वैशाख वणवा अनुभवल्यावर ज्येष्ठापासूनच तनामनाला शांत करणाऱ्या पावसाच्या सरींचे आणि विविध मंगल सणवारांचे वेध सर्वांनाच लागतात. पुणेकर रसिक, कीर्तनप्रेमी भक्त आणि आदित्यव्रती यांनाही वेध लागतात गुरुदेव अभ्यंकरांच्या आषाढी एकादशीच्या वारकरी कीर्तनाचे!

गेली ३०-३५ वर्षे गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली तरुण टाळकरी आणि गुरुदेव आषाढीला विठ्ठलचरणी कीर्तनसेवा रुजू करतात. सर्वांगसुंदर कीर्तनसोहळा श्रवण करणे, पाहणे हा एक अमृतानुभव असतो. ‘हरिकीर्तने भरावा । ब्रह्मगोळ अवघा ।’ असे समर्थ दासबोधातील चौथ्या दशकात सांगतात- कारण दशकलांचा संगम असलेली कीर्तनभक्ती उत्कट आणि भव्य तर आहेच पण विश्वकल्याणकारी सुद्धा आहे. कीर्तनाची थोरवी अशी की जगाबरोबर जगदीशही कीर्तनात संतुष्ट होतो.

यावर्षी एम.आय.टी., पुणे यांच्या स्वामी विवेकानंद सभागृहात हा कार्यक्रम दि. १० जुलै २०२२ ला संपन्न झाला.

गुरुदेव शंकर अभ्यंकर लिखित शङ्कर रामायणाच्या ‘अरण्यकाण्डा’चे प्रकाशन प्रारंभी पू. ब्रह्मलीन वरदानंद भारती यांचे सुपुत्र श्री. महेश आठवले यांच्या हस्ते टाळयांच्या गजरात करण्यात आले. श्री. महेशजी यांनी मनोगतात या ओवीबद्ध ग्रंथाची ओघवती भाषा, ग्रंथाची मांडणी यांचे कौतुक केले. ते म्हणाले, यातील अभ्यासपूर्ण परिशिष्टे पाहून याला ग्रंथ न म्हणता प्रबंधच म्हणायला पाहिजे. वाचायला प्रारंभ केला की वाचक यात गुंतत जातो. हिंदू धर्मसंस्कृती समजण्यासाठी रामायण-महाभारताचाच अभ्यास केला पाहिजे. संस्कृती संवर्धनाच्या आदित्य प्रतिष्ठानच्या कार्यात सर्व अभ्यंकर परिवाराचे गुरुदेवांसह योगदान आहे हे गौरवास्पद आहे. प्रत्येक सर्गाच्या शेवटी ‘भारतासी वैभव यावे । हिंदूंनी अधिष्ठान ल्यावे । संस्कृति अलंकार व्हावे । शङ्कर रामायण ॥’ असे अद्वितीय पसायदान त्यांनी हिंदू समाज, राष्ट्रासाठी मागितले आहे. निष्काम कर्मयोगाचे हे परमोच्च उदाहरण आहे. हे सर्वांगसुंदर रामायण भारतीय आणि मराठी साहित्याचा अलंकार बनून राहील हे निर्विवाद!

प्रकाशन कार्यक्रमात सौ. रश्मी तुळजापूरकर

यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाशनाच्या हृद्य कार्यक्रमानंतर कीर्तनातील टाळकरी, वीणाधारी सीए जितेंद्र अभ्यंकर, डॉ. आदित्य अभ्यंकर, श्री. अमित तुळजापूरकर, श्री. निशांत बापट, श्री. नीरज कुलकर्णी, श्री. योगेश करवीर, श्री. रोहित फडणीस यांनी रंगमंचावर पदार्पण केले. 'जयजय रामकृष्ण हरि' या गजराने प्रेक्षागृह दुमदुमले. रूपाचा अभंग (संत ज्ञानदेव रचित) आणि ध्यानाचा अभंग (संत तुकाराम रचित) जितेंद्र अभ्यंकर यांच्या सुरेल आवाजात संपन्न झाल्यावर गुरुदेवांचे आगमन झाले. वीणाधारी जितेंद्र अभ्यंकर यांना वंदन करून त्यांनी वीणा धारण केला. विठोबा-रखुमाई आणि विठ्ठल विठ्ठल अशा भक्तियुक्त गजराने प्रेक्षागृहात जणू पंढरी अवतरली.

गुरुदेवांनी वीणा वीणेकऱ्याच्या हाती दिला आणि कीर्तनास प्रारंभ केला. सेवेसाठी त्यांनी संत तुकोबांचा अभंग घेतला-

'भूती देव म्हणोनि भेटतो या जनां ।
नाहीं हे भावना नर-नारी ॥१॥
पांडुरंग जाणे भाव अंतरीचा ।
न लगे द्यावा साचा परिहार ॥२॥
दयेसाठी केला उपाधि पसारा ।
जड जीवा तारा कथा नाव ॥३॥
तुका म्हणे नाही पडत उपवास ।
फिरतसे आंस धरोनिया ॥४॥'

संपूर्ण अभंग सांगितल्यावर पुनश्च सभागृह विठ्ठल नामाच्या गजरात रंगून गेले. सीए जितेंद्र यांनी अभंगाचे सुरेल गायन दुर्गा रागात केले.

गुरुदेव म्हणाले, 'आषाढी एकादशी म्हणजे वारकऱ्यांचा, भक्तांचा सर्वोत्तम सण! भक्तवत्सल विठ्ठलाच्या रूपात साक्षात परब्रह्म युगानुयुगे वीटेवर उभे ठाकले आहे असा वारकऱ्यांचा विश्वास आहे. लक्षावधी वारकरी या लोकेश पांडुरंगाचे दर्शन घेऊन कृतार्थ होतात. पंढरपूर म्हणजे साक्षात भूवैकुंठच! पंढरपूर पूर्वी पुंडलीकपूर, लोहदंड क्षेत्र, पांडुरंगपल्ली, पंडरी इत्यादी नावांनी ओळखले जायचे. परंतु शेवटी पंढरपूर किंवा पंढरी हे नावच वारकरी संप्रदायात आणि जनमानसात स्थिरावले. विठ्ठल, विठोबा या नावाचे ३-४ अर्थ होतात. १) श्रीविष्णूचे प्राकृत रूप, विश्वव्यापक म्हणून विठ्ठल. २) विटेवरी ठेला म्हणून विठ्ठल. ३) विनतेचा पुत्र गरुड म्हणजेच वैनतेय, ठोबाचा अर्थ वाहन, गरुड ज्याचे वाहन तो श्रीविष्णू- म्हणजे कृष्ण-विठ्ठल. कारण विठ्ठल हे बाळकृष्णाचेच रूप समजतात. ४) 'वि' म्हणजे आत्मज्ञान, ठोबा प्रकट होणे, आत्मज्ञान साकार होऊन प्रकट झाले म्हणून विठोबा!

पंढरपूरच्या वारीमध्ये भजन महत्त्वपूर्ण असते. संतांच्या पादुकांच्या पालखीबरोबर मार्गक्रमण करणारे वारकरी ऊन-पाऊस अंगावर घेत १८-१९ दिवस अखंड भक्तिरंगात रंगून, चालत चालत पंढरीला जातात. वारी म्हणजे वारकऱ्यांची कायिक, वाचिक, मानसिक तपश्चर्याच असते. कायेला (शारीरिक) श्रम तर असतातच. वाचेने पण प्रत्येक वारकरी माउली म्हणून संबोधला जातो. प्रत्येकजण माउलीच! मनामध्ये सर्वांविषयी सद्भावना असते. मार्गक्रमण करताना भजन, अभंगगायन, विठ्ठल नामाचा गजर, ज्ञानबा-तुकारामाचा घोष करतच ते जातात. विठ्ठलाच्या ठायी हरिहर संगम आहे अशी वारकऱ्यांची श्रद्धा आहे. विठ्ठलमूर्तीच्या मस्तकावरील टोपी ते शिवलिंग मानतात. अशी ही गोजिरवाणी विठ्ठलमूर्ती युगानुयुगे प्रिय भक्तांसाठी विटेवरी समचरणी उभी आहे.

संतांचे आत्मप्रचितीचे अभंग सर्वात श्रेष्ठ असतात. या वेळेला सेवेला घेतलेला तुकारामांचा अभंग असा आत्मप्रचितीचा होता. तुकाराम महाराज सांगतात, नर-नारी हा भेद आत्मज्ञान झालेल्या लोकोत्तरांसाठी नसतोच. संत महात्मे लोकांच्या कल्याणाची अखंड काळजी घेतात. अवघ्या मानवमात्रांमध्ये त्यांना एकच तत्त्व प्रत्ययास येते. गीतेच्या पाचव्या अध्यायात भगवंत सांगतात,

'विद्याविनय संपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनी ।

शुनिचैव श्वपाकेच पण्डिता: समदर्शिन: ।'

विद्यासंपन्न, विनययुक्त ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा आणि चांडाल या सर्वांप्रती आत्मज्ञानी महापुरुष समदृष्टी ठेवणारे असतात. त्यांच्यासाठी सर्व जग विष्णुमयच असते. एकाच सोन्याच्या लगडीतून अनंत दागिने घडतात तसेच अनंत ब्रह्मांडे एकाच परमात्म्यातून निर्माण होतात. तो परमात्मा मातेसारखाच प्रेमळ असतो. तो स्त्री-पुरुष असा भेद करतच नाही.

आत्मज्ञानी संतांचा आत्मानुभव, 'जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत । हा भक्तियोग निश्चित। जाण माझा ॥' असा असतो. वारकरी वर्षभरात चार वेळा वारी करतात. १) चैत्री, २) आषाढी, ३) कार्तिकी, ४) माघी. परंतु वारकऱ्यांचा भाव,

'पावले पावले तुझे आम्हां सर्व ।
नको देऊ दुजा भाव काही ॥
जेथे तेथे देखे तुझीच पाऊले ।
त्रिभुवन संचले विठ्ठला गा ॥' असाच असतो.

तुकोबांचा विश्वात्मक अनुभव साधकावस्थेपासूनच कसा होता आणि तत्संदर्भात ते पांडुरंगाची आळवणी कशी करतात, यासाठी डॉ. आदित्य यांनी भटियार रागात-

'नरनारी बाळे अवघा नारायण ।
ऐसे माझे मन करी देवा ॥
करावे साह्य पुरवी मनोरथ ।
व्हावे कृपावंत तुका म्हणे ॥

हा अभंग गायन करून वारकऱ्यांचा उत्कट भक्तिभाव नेमका व्यक्त केला. संत तुकाराम औपनिषदिक तत्त्वज्ञान सांगतात, 'संचित, प्रारब्ध, क्रियमाण । अवघा झाला नारायण ॥' अशी मनाची अवस्था झाल्याने ते म्हणतात, मला सर्वच सारखे! प्रत्यक्ष, अनुमान वा शब्द यांपैकी कुठलेही प्रमाण असो, अंतरात असलेल्या पांडुरंग-विषयक प्रेमाचे कुठलेही समर्थन (परिहार) देण्याची आवश्यकता नाही. योग्यांना दुर्लभ अशा परमात्म्याचे दर्शन मी घेतले.



सीए जितेंद्र यांनी ही भावना माउलींच्या अभंगातून, अप्रतिम गायनातून व्यक्त केली.

'योगिया दुर्लभ तो म्यां देखिला साजणी ।
पाहता पाहता पुरे न ही धणी ।
अनंत रूपे अनंत वेषे देखिले म्यां त्यासी ।
बाप रखुमादेवीवरू खूण बाणली कैसी ॥

परब्रह्माचा अनुभव घेताना तृप्ती होतच नाही. दुजेपण मिटून जाते. अद्वैताचा गोमटा लाभ होतो.

'देह हे पंढरी आत्मा पंढरिराव ।
यात्रा महोत्सव सर्वकाळ ॥
वैराग्य भीवरा ज्ञान पुंडलीक ।
तेथोनी सन्मुख पांडुरंग ॥'

हा समर्थ रामदासांचा अनुभव तेच सांगतो.

तुकाराम महाराज पुढे म्हणतात, 'दयेसाठी केला उपाधी पसारा ।' खरे तर उपाधीपासून लांब राहा, टाळा असे म्हणतात. मग महाराज हा उपाधी पसारा कुणासाठी करतात? हे सांगण्यासाठी सीए जितेन्द्र यांनी जौनपुरी रागात एका अर्थपूर्ण भजनाचे अतिशय सुंदर गायन केले.

'काय वाणू आता न पुरे ही वाणी ।
मस्तक चरणी ठेवीतसे ।
भूतांची दया हे भांडवल संता ।
आपुली ममता नाही देही ॥'

याचाच अर्थ, महाराजांना हेच सांगायचे आहे की 'आम्ही वैकुंठवासी आलो याच कारणासाठी' ऋषिमुनींचे स्मरण द्यायला आलो. सामान्य जनांचा कळवळा म्हणून, मर्त्य जगाला सत्पथावर चालवण्यासाठी अवतार धारण करतात. फक्त दुर्जनांना मारण्यासाठी नाही. 'मर्त्यावतारत्विह मर्त्यशिक्षणं न रक्षोवधायै: केवलम् ।' हे भागवताचे या संदर्भातील

वचन सार्थ आहे.


यानंतर 'ज्ञानेश्वर माउली, ज्ञानराज माउली तुकाराम' ह्या भक्तिरसपूर्ण भजनात, रिंगणात टाळकरी, श्रोते टाळवाद्यांच्या, टाळ्यांच्या गजरात भक्तिभावाने दंग झाले. भजन झाल्यानंतर गुरुदेवांनी श्रोत्यांच्या मनातील चार आशंका प्रकट केल्या. त्यांना उत्तरे देण्याआधी डॉ. आदित्य यांनी बागेश्री रागात अभंगाचे मधुर गायन केले. पहिली आशंका, स्त्रीपुरुष भेद का कळत नाही याचे उत्तर देताना गुरुदेव म्हणाले, व्यावहारिक सत्तेत अशक्य असले तरी तुर्यगा अवस्थेत सर्वत्र विठ्ठलाचीच अनुभूती असते. जसे नामदेव महाराज म्हणाले, की विठ्ठलाला पाहता पाहता डोळ्याची बाहुलीच विठ्ठल झाली तर कुणी कुणाला पाहायचे? कानच शब्द झाले तर कुणी कुणाचे ऐकायचे? असा हा अद्वैताचा प्रत्यय!

दुसऱ्या आशंकेला उत्तर देताना गुरुदेव म्हणाले, 'ऋताधिष्ठित सत्याला परिहार (आत्मसमर्थन) द्यावे लागत नाही. म्हणून 'न लगे द्यावा साचा परिहार'.

तिसऱ्या आशंकेला उत्तर देताना गुरुदेवांनी स्पष्ट केले की उपाधी पसारा का केला, तर संत मुक्तच असतात. जनांना तारण्यासाठी, त्यांचा उद्धार करण्यासाठी, त्यांना भक्तीचा राजमार्ग ब्रह्मरूप होण्यासाठी दाखवला.

'अवघाचि संसार केला ब्रह्मरूप ।
विठ्ठल स्वरूप म्हणोनिया ॥'

अभंग ज्ञान (ग्रंथ ज्ञान) मिळवले नाही तर काय होईल? या चौथ्या आशंकेला उत्तर देताना गुरुदेव म्हणाले, ग्रंथांमधून असलेले शास्त्र साररूपाने घ्यावे. कारण 'अनंतपारं किल शब्दशास्त्रं ।' शास्त्रांची, अभ्यासाची व्याप्ती महासागरासारखी आहे. आयुष्य छोटे आहे आणि त्यात विघ्नेही भरपूर! म्हणून सार निवडीला महत्त्व! गुरुदेवांनी विठ्ठल भक्तीचा अभंगांमधील गोडवा वर्णन केला. शाश्वत सुख घनीभूत होऊन पांडुरंग रूपाने उभे आहे हे जाणवून दिले. मनाला आनंद देणाऱ्या नंद रागामध्ये डॉ. आदित्य यांनी भक्तीचा परमोच्च आनंद असा व्यक्त केला.



'मन वाचातीत तुझे हे स्वरूप ।
म्हणोनिया माप भक्ती केले ।
भक्तीचिया मापे मोजितो अनंता ।
इतरांनें तत्त्वता मोजवेना ॥'

कीर्तनाची सांगता करताना गुरुदेवांनी, इतरांसारखाच दिसणारा आत्मज्ञानी पण अलिप्त संताचे वर्णन करताना ज्ञानेश्वरीतील–

'जो अंतरी दृढु । परमात्मरूपी गुढु ।
बाह्य तरी रूढु । लौकिका जैसा ॥
तैसा संसर्गामाजि असे । सकळांसारिखा दिसे ।
जैसे तोयसंगे आभासे । भानुबिंब ॥'

या ओवीची आठवण करून दिली. त्यानंतर सेवेचा अभंग सर्वांनी भैरवीत गायला. विठ्ठल नामाचा गजर करून शेवटी ज्ञानदेव, तुकाराम, विठ्ठल यांच्या आरती गाऊन कीर्तनाची सांगता झाली.

कीर्तन श्रवणाच्या या सात्त्विक आनंदाची कशाशी तुलना करावी? हा आनंद खरोखरच अतुलनीय, अमोज आणि अनुपमेय आहे. गुरुदेवांचे कीर्तन श्रवण करणे आणि त्यांच्या बरोबरीने भजनरंगी दंग होणे हा एक आत्मिक तृप्ती देणारा अनुभव आहे. त्यांचे कीर्तन श्रोत्यांना खरेच निष्काम ज्ञानयज्ञाची अनुभूती देते. 'कीर्तन संपूच नये असे वाटत होते' असे उद्गार श्री. महेशअण्णा आठवले यांनी काढले, यात हेच रहस्य आहे. गुरुदेवांच्या या सात्त्विक यज्ञव्रतात आपण सहभागी असतो हा आपला भाग्ययोग! म्हणूनच-

'गुरु: साक्षात् परब्रह्म । तस्मै श्री गुरवे नम: ॥'
पांडुरंग हरि । वासुदेव हरि ॥

* * *

# शङ्कर रामायण - अरण्यकाण्ड

## (‘वाल्मीकि रामायणा’वरील ओवीबद्ध टीका)



– श्रीमती वंदना जोशी



**गुरुदेव शंकर अभ्यंकर लिखित ‘शङ्कर रामायण–अरण्यकाण्ड’ ग्रंथाचे प्रकाशन मा. महेशजी आठवले यांच्या हस्ते दि. १० जुलै २०२२ रोजी संपन्न झाले. त्या ग्रंथात काय आहे हे अवश्य जाणून घ्या.**

गुरुदेव शंकर अभ्यंकरांनी वाल्मीकि रामायणाचे यथार्थ व ऐतिहासिक दर्शन घडावे म्हणून ओवीबद्ध शंकर रामायण लिहिण्याचा संकल्प सोडला. सत्य संकल्प, प्रभू रामचंद्रच पूर्ण करून घेत आहेत. या रामायणाचे पहिले दोन खण्ड ‘बालकाण्ड’ व ‘अयोध्याकाण्ड’ प्रकाशित झाले आहेत. अरण्यकाण्डाचे प्रकाशन झाले व किष्किंधाकाण्ड लिहून पूर्ण झाले आहे. रामायणाचे सत्यदर्शन आणि श्रीरामांच्या पुरुषार्थाचे प्रतिपादन हाच ‘शङ्कर रामायण’ निर्मितीमागील गुरुदेवांचा प्रधान हेतू आहे.

**ग्रंथ वैशिष्ट्ये व परिचय –** ‘शङ्कर रामायण’ या ओवीबद्ध महाकाव्याचा तृतीय खण्ड ‘अरण्यकाण्ड’ होय. या खंडात एकूण ७५ सर्ग आहेत. वाल्मीकि रामायणातील अरण्यकाण्डातील सर्व एकूण २४४७ श्लोकांवरील ओवीबद्ध टीका यात अंतर्भूत आहे. शङ्कर रामायणातील हे ‘अरण्यकाण्ड’ ७६५८ ओवीसंख्येने शब्दांकित झालेले आहे. या ग्रंथाची पृष्ठे ९६+५२० आहेत. शिवाय रंगीत पृष्ठे वेगळीच! सहज, सुबोध आणि सरल अर्थांच्या रसाळ ओव्यांच्या रूपाने आदरणीय गुरुदेवांनी श्रद्धेय वाचकांना हे मोठे विचारधन प्रदान केले आहे.

**सर्गानुसार विषय सूची –** ग्रंथाच्या सुरुवातीला प्रत्येक सर्गातील विविध विषय, त्यांचा पृष्ठक्रमांक व ओवीक्रमांक दिलेला आहे. ही नोंद पाहून आपल्याला हवा असलेला विशिष्ट संदर्भ वाचकाला त्वरित उपलब्ध होऊ शकतो.

श्रीरामचंद्रांचे वनवासाला प्रयाण, या प्रवासातील मार्गात लागलेले विविध ऋषी-मुनींचे आश्रम, तेथील वास्तव्य, मुनींच्या कथा, निरनिराळ्या राक्षसांची माहिती, रावणाचे आकाशमार्गे गमन, शूर्पणखेचे दुष्ट हेतू, मारीच आणि त्याची मायावी विद्या, लक्ष्मणरेषा-दंतकथा, सीतेचे सतीत्व, सीतेची श्रीरामांवरील निष्ठा, विवाह-संकल्पना, श्रीरामांचे मानवी वर्तन, नहुष कथा, मुक्तीचे प्रकार इत्यादी विपुल विषय या ग्रंथात समाविष्ट आहेत.

श्रीरामांचे चरित्र, रामायणातील कथा, प्रसंग व घटना सर्वज्ञात आहेत. तथापि ह्या सूचीतील विषय पाहिले की त्याबाबत पुन:पुन्हा वाचावेसे वाटते. गुरुदेवांनी रचलेल्या सुबद्ध, सुमधुर आणि सुभग ओव्या वाचकांना आनंदाचा आगळा प्रत्यय देतात.

**कवीचे मनोगत (प्रस्तावना) –** 'अरण्यकाण्ड' या ५२० पृष्ठसंख्या असलेल्या बृहद् खंडाचे स्वरूप विशद करताना आदरणीय गुरुदेवांनी या प्रस्तावनेतून आपले मनोगत व्यक्त केले आहे.

'अरण्यकाण्डा'चा कालपट, त्याचा इतिहास, त्यातील घटनांचे वास्तव, विविध संदर्भ, निरनिराळे दाखले आणि उदाहरणे यांचे नेटके व नेमके विवरण गुरुदेवांनी केले आहे. त्यामुळे या संपूर्ण ग्रंथातून आपल्याला काय वाचायला मिळणार आहे याची निश्चित पूर्वकल्पना वाचकांना येते. मधुर आणि रसाळ ओव्यांमुळे हा कथाभाग अधिकाधिक आत्मीयतेने समजून घेण्यास वाचकांची उत्सुकता वाढीस लागते.

**अरण्यकाण्डाचे वैशिष्ट्य –** या दीर्घ प्रस्तावनेत गुरुदेवांनी अरण्यकाण्डाचे वैशिष्ट्य विशद केले आहे. त्यासंबंधी ते लिहितात, "१४ वर्षांसाठी वनवास स्वीकारून दण्डकात आलेल्या राम, सीता, लक्ष्मणासाठी अरण्यकाण्ड कष्टदायी आहे. अरण्यकाण्डात वीररस तर आहेच, पण विराध, कबन्ध, खर, दूषण, शूर्पणखा यांच्यामुळे बीभत्स रसही अवतरला आहे. महर्षी शरभङ्गांपासून महर्षी अगस्त्यांपर्यंत प्रकटलेल्या श्रेष्ठ आचार्यांमुळे अरण्यकाण्डाला ज्ञान-भक्तीचे अधिष्ठान प्राप्त झाले आहे. पंचवटीतील सौख्याच्या कालखण्डात दिव्य शृंगाराच्या छटाही उमटल्या आहेत.

श्रीरामांच्या दण्डकारण्य प्रवेशापासून त्यांचे लक्ष्मणासह पम्पा सरोवराजवळ येणे, हा प्रदीर्घ कथाभाग म्हणजे अरण्यकाण्ड होय. इतिहासासह रामायणकालीन भूगोल अधोरेखित करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम अरण्यकाण्डाने केले आहे."

ह्या दीर्घ प्रस्तावनेच्या आधारे 'अरण्यकाण्डा'चा गाभा थोडक्यात समजून घेऊ या.

**दण्डकारण्य –** श्रीरामांनी वनवासाचा प्रदीर्घ काळ दण्डकारण्यात व्यतीत केला. दण्डकारण्याचे मूळ नाव, दण्डकराज्य, राजा दाण्डक्य, श्रीरामांचा दण्डकारण्य प्रवेश, विराध राक्षसाची कथा, त्याचा वध हे सारे संदर्भ यात आहेत.

**महर्षी शरभङ्ग –** श्रीरामांच्या दण्डकारण्यातील प्रवासात त्यांनी पुढे कोठे व कसे जावे याचे महर्षी शरभङ्ग यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. मंदाकिनी नदीच्या प्रवाहाविरुद्ध प्रवास करून महर्षी सुतीक्ष्णांच्या आश्रमात जाण्यास सांगितले. ते सुरक्षित निवासस्थान होते. ह्या मोठ्या प्रवासाचे मनोहारी वर्णन ओव्यांमधून प्रकटले आहे.

'मन्दाकिनीचे प्रवाहात । सुगंधी सुपुष्पांनी युक्त।
नावा धावती अखण्डित । किती सान ।।
नदी प्रवाहाचे उलट । सजविल्या सान नावेत ।
किनाऱ्याने थेट रेषेत । जावे स्थाना ।।'
(श. रा. अरण्य. ५.८९ व ९०)

या अतिशय सुंदर शब्दकळेतून मन्दाकिनी नदीचा प्रवाह आपल्या नेत्रांसमोर वाहता होतो. 'मन्दाकिनी' नावाच्या चार नद्यांचा संदर्भ त्यातील बारकावे व्यक्त करतो. या वाटेने जाताना मध्ये भेटलेल्या अनेक वानप्रस्थी तपोजनांनी श्रीरामांना केलेली प्रार्थना–

'नरभक्षक भयङ्कर । करिती ते अनेकवार ।
हत्या मुनींची वारंवार । अत्याचारी ।।
रक्षावे, रक्षावे आपण । रक्षावे प्रभो पुण्ण्यगण ।
राक्षसांपासून रक्षण । करावे जी ।।'

या ओव्यांतून त्याकाळी राक्षसांनी, नरभक्षकांनी घातलेला धुमाकूळ, ऋषीमुनींचा होणारा संहार, दैत्यांचे वाटणारे भय, ह्याचे जिवंत चित्रण डोळ्यांपुढे येते. या दुष्ट असुरांचा आपल्या पराक्रमाने नायनाट करण्यासाठी श्रीराम सर्वांना आश्वस्त करतात– 'पारिपत्य हे शस्त्रबळे । मारेन मी राक्षसकुळे । भयमुक्त ती गुरुकुले । होतील आता ।।' ते पुढे म्हणतात, 'रक्षेन आपुले आश्रम । पावन जे जे पुण्ण्य धाम । बंधुसहित पराक्रम । पाहावा मम ।।' (श. रा. अरण्य. ६.५८ ते ६४)

ऋषि-मुनींना अभय देऊन यज्ञ-संस्कृतीचे रक्षण करण्याचे महान कार्य श्रीरामांनी वनवासाच्या या मार्गावर पार पाडले. सत्त्वाचे रक्षण करण्याची आपल्या गुरूंनी दिलेली शिकवण सदैव ध्यानात ठेवून श्रीराम आपले वचन प्राणपणाने जपतात आणि प्रत्यक्षात

आचरतातही. त्यांनी जानकीला स्पष्ट सांगितले–

'येक वेळ प्राणा देईन । परि वचनास राखेन ।
म्हणवेन रघुनन्दन । एकवचनी ।।
जनकनन्दिनी तू जाण । राखताना ऐसे वचन ।
प्रसङ्गी तुजसी त्यागेन । लक्ष्मणासह ।।'
(श. रा. अरण्य. १०.७० ते ७५)

या ओव्यांचा संदर्भ आपल्या मनोगतातून देताना गुरुदेव वाचकांचे लक्ष यातील शेवटच्या ओवीकडे वेधतात. ते लिहितात, ''यातील शेवटची ओवी अत्यंत महत्त्वाची आहे! 'वचन राखण्यासाठी प्रसंगी सीता, लक्ष्मण यांचा त्यागही करेन, असे श्रीराम म्हणतात.' पुढे उत्तरकाण्डात जे प्रत्यक्ष घडले, त्या घटनेचा वाचिक सूत्रपातच अरण्यकाण्डात झाला आहे!''

**वनवासाची दहा वर्षे –** दण्डकारण्यातील विविध आश्रमांना दैत्यांपासून भयमुक्त करीत श्रीराम-सीता, लक्ष्मण हिंडले आहेत. या प्रदीर्घ कालखंडात उभयतांचे जीवन कसे व्यतीत झाले, हे वर्णिलेल्या ओव्या वाचताना मन आनंदाने भरून जाते.

**निसर्गवर्णन –** या प्रवासात श्रीरामांनी अनेक सुंदर पर्वतशिखरे आणि रमणीय नद्या पाहिल्या. एका सरोवराचे वर्णन करणाऱ्या ओव्या–

'मिसळला संधिप्रकाश ।
निळ्या नि सावळ्या जळात ।
उमले कमलपुष्पात । अत्यद्भुत ।।
लालसर, नाजुक श्वेत । कमलपुष्पे अगणित ।
नाचत होती आनंदात । सरोवरी ।।'
(श. रा. अरण्य. ११.३०)

या आणि पुढील ओव्यांमधून रमणीय तलाव, जलचर, पक्षी, राजहंस या साऱ्यांचे केलेले वर्णन विलोभनीय आहे.

**श्रीराम दण्डकारण्यात येण्याचा राष्ट्रात्मक अर्थ –** हा संदर्भ उलगडून दाखविताना ज्या ओव्या गुरुदेवांनी लिहिल्या आहेत, त्यातील एक–

'दण्डकवनाचा प्रारंभ ।
मारणे राक्षसांचा दंभ ।
आलासे जानकीवल्लभ । राजवीर ।।
फेडावया राष्ट्राचे ऋण ।
सन्मानिण्या ऋषींचा सण ।
पुरुषार्थ रघुनन्दन । प्रकटलासे ।।'
(सर्ग ११.८३ ते ८७)

या ओव्यांमधून दैत्यविनाश, सद्धर्माचे रक्षण आणि ऋषि-मुनींच्या संस्कृतीचे, संस्कारांचे व शिक्षणाचे दृढीकरण करून आर्यावर्तात करावयाचा प्रसार ही श्रीरामांनी पार पाडलेली बहुमोल कामगिरी व त्यामागील उदात्त हेतू व्यक्त झालेले आहेत.

**महर्षी सुतीक्ष्णांचा आश्रम –** शरभङ्गांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे श्रीराम, लक्ष्मण व जानकीसह सुतीक्ष्ण मुनींच्या आश्रमात पोहोचले. सुतीक्ष्णांचा आश्रम सह्याद्री परिसरात होता. महर्षी सुतीक्ष्णांच्या आश्रमापासून पञ्चवटी सुमारे ९०-१०० कि.मी. अंतरावर होती. सुतीक्ष्णांचा आश्रम महाराष्ट्रात होता. या परिसरात श्रीरामांचा वनवासाचा प्रदीर्घ कालखण्ड (सुमारे पावणे बारा वर्षे) व्यतीत झाला. महाराष्ट्रभूमी श्रीरामचरणांनी पावन झाली.

**श्रीराम आणि अगस्त्य ऋषी यांची भेट –** रामायणातील या एका लोकोत्तर घटनेचा साद्यंत वृत्तांत आपल्याला वाचायला मिळतो. रामायणाच्या संपूर्ण इतिहासाला मिळालेले वेगळे वळण, याबाबत गुरुदेवांनी लिहिलेली ही ओवी

'अगस्त्य रघुनाथ भेट । पालटे रामकथा पट ।
शङ्कर जाहला संतुष्ट । अंतर्यामी ।।' .
(अरण्य. ११.३३६)

पुढील तपशील वाचण्यासाठी वाचकांची उत्सुकता वाढविते.

**पञ्चवटी –** गोदावरी तटी असलेल्या पञ्चवटीच्या निसर्गरम्य परिसरात श्रीरामांच्या आज्ञेनुसार लक्ष्मणाने निवासासाठी पर्णकुटी बांधली. ह्यासंबंधीच्या कथनातून पञ्चवटीच्या, जनस्थानाच्या विशाल भूमीचे, तेथील शेतीभातीचे, पशूपक्ष्यांचे व सभोवतालच्या सृष्टीचे वर्णन करणाऱ्या प्रसन्न ओव्या आहेत.

पंचवटीतील निवासात शूर्पणखेच्या रूपाने आलेले मोठे संकट, तिने स्वत:च्या अपमानाच्या संदर्भात रावणासमोर केलेला थयथयाट, त्यानिमित्ताने त्याचा घेतलेला झाडा, श्रीरामांनी केलेला खर-दूषण यांचा पराभव, मारीचाचा इतिहास, रावणाने त्याला हाती घेऊन रचलेले कारस्थान, मायामृग इत्यादी वृत्तांत यात समाविष्ट आहे. श्रीराम कांचनमृगामागे का धावत गेले, याची कारणे, स्पष्टीकरण व ते प्रसंग गुरुदेवांच्या ओघवत्या शैलीतील ओवीबद्ध रचनेतून उलगडत जातात. 'लक्ष्मणरेषा' ही दंतकथा आहे, ह्याबाबतचे विवरणही वाचकांचे गैरसमज दूर करण्यास मोलाचे साह्य करते.

सीताहरण, रावणाने गगनमार्गे लंकेकडे केलेले उड्डाण, मार्गातील जटायूची झुंज, त्यात झालेले जटायूचे मरण हे सर्व डोळ्यांपुढे जसेच्या तसे उभे राहते. जटायूच्या मृत्यूविषयी गुरुदेवांनी लिहिलेली ओवी–

'राष्ट्रासाठी दिव्य मरण । हे चि मृत्युञ्जय जीवन।
साङ्गते श्रेष्ठ रामायण । शङ्कराचे ॥'
(श. रा. अरण्य. ५०.१००)

हा इतिहास आपण वाचलाच पाहिजे ही ऊर्मी मनात उत्कटतेने निर्माण करते. सीतेने केलेला रावणाचा प्रतिकार, तिचे पातिव्रत्य, सीता वियोगामुळे श्रीरामांनी केलेला शोक आणि विलाप. याबरोबरच वनवास, पिता दशरथाचा मृत्यू, माता व भरत-शत्रुघ्न यांचा वियोग, राक्षसांची आपत्ती हे सर्व मनात येऊन श्रीरामांचा कासावीस झालेला जीव व्यक्त करणाऱ्या करुण ओव्या वाचून वाचकाचे अंत:करण गलबलून जाते.

'करिता शोक रघुवर । थरकापले चराचर ।
शङ्करासही गहिवर । 'शङ्कर रामायणी' ॥
(श. रा. अरण्य. ६३.७०)

ही करुण ओवी लिहिताना स्वत: कवीचे संवेदनशील मन गहिवरून गेले आहे.

**सीता शोध –** श्रीराम व लक्ष्मण दोघांनी चित्त सावध व एकाग्र करून ज्या गतीने सीता शोधास प्रारंभ केला तो सगळाच विलक्षण असा भाग ओव्यांच्या द्वारे उत्कटतेने व्यक्त झाला आहे. जटायू मुक्ती, सुग्रीव भेट, दीर्घकाल तप करून सिद्धा झालेल्या शबरीचा रामभेटीमुळे उचंबळून आलेला भक्तीभाव, उष्ट्या बोरांची दंतकथा, शबरीची मुक्ती इत्यादी तपशील विस्तृत व सखोल स्वरूपात आपणास वाचायला मिळतात. 'सीतेचे अपहरण' ही रामकथेला कलाटणी देणारी महत्त्वाची घटना या अरण्यकाण्डात आहे.

**परिशिष्टे –** वाल्मीकि रामायणातील अरण्या-काण्डातील ७५ सर्गांमधील श्लोकांची ओवीबद्ध टीका पूर्ण झाल्यानंतर शङ्कर रामायणातील या अरण्य-काण्डातील लेखनाला पूरक असणारी एकूण १२ परिशिष्टे जोडलेली आहेत. ती सर्व वाचनीय आहेत.

शहाण्णव पृष्ठांची दीर्घ प्रस्तावना, करवीर पीठाच्या श्रीस्वामी जगद्गुरू शंकराचार्यांचा पत्ररूपी आशीर्वाद, अरण्यकाण्डातील श्रीरामांच्या प्रवासाच्या ऐतिहासिक स्थळांची रंगीत चित्रे, सुव्यवस्थित अनुक्रमणिका, या विविध तपशीलांनी 'अरण्यकाण्ड' सशब्द, सओवी साकार झाले आहे.

वाचकांना 'अरण्यकाण्ड' ग्रंथाचा अल्पपरिचय करून द्यावा, यासाठीचा हा लहानसा शब्दप्रपंच! आदरणीय गुरुदेवांची अलौकिक बुद्धिमत्ता, त्यांचा गाढ विद्याव्यासंग, त्यांची तरल संवेदनशीलता आणि वाल्मीकि रामायण सर्वसामान्यांपर्यंत सहज व सुबोध ओव्यांमधून पोहोचविण्याचा यत्न, सर्वांच्या उन्नतीसाठी त्यांना आपली थोर भारतीय संस्कृती समजावून सांगण्यासाठी मनात असलेली तळमळ व कळकळ हे सारे आपल्या सर्वांसाठी मोलाचे विचारधन आहे. आपण सगळेजण या तृतीय खण्डाचे 'अरण्यकाण्डा'चे मनोभावे स्वागत करू या, ते आवडीने वाचू या. संग्रही ठेवू या. इतरांनाही देऊ या!

* * *

**शङ्कर रामायण-अरण्यकाण्ड, मूळ किंमत रु. ५००/- सवलत किंमत रु. ३५०/- मात्र. शङ्कर रामायण 'बालकाण्ड', 'अयोध्याकाण्ड', 'अरण्यकाण्ड' हे तीन ग्रंथ मूळ किंमत १६५०/- रुपयाचे एकत्रित घेतल्यास केवळ १०००/- रुपयात उपलब्ध.**

# बालगंधर्व संगीत रसिक मंडळ
# गौरव समारंभ

**(दि. १५ जुलै २०२२)**



स्मरणिका प्रकाशन




श्री. मुकुंद मराठे यांचा गौरव

नटसम्राट बालगंधर्वांच्या ५५ व्या स्मृतिदिनानिमित्त बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे महाराष्ट्र संगीत रंगभूमीवरील कलाकारांचा गौरव, स्मरणिका प्रकाशन व नाट्यसंगीताची मैफल असा कार्यक्रम बालगंधर्व संगीत रसिक मंडळ या संस्थेच्या वतीने संपन्न झाला. या समारंभाचे अध्यक्षस्थान गुरुदेव अभ्यंकरांनी भूषविले.

दरवर्षी या संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील संगीत क्षेत्रातील गुणी कलावंतांना गौरविले जाते. यावर्षी श्री. राम मराठे यांचे चिरंजीव श्री. मुकुंद राम मराठे यांचा विशेष गौरव बालगंधर्व पुरस्काराने केला गेला. श्री. मुकुंद मराठे यांच्या मनात गुरुदेवांविषयी अपार श्रद्धा आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या मनोगताची सुरुवात 'आम्हा तो शंकर सुखकर हो' या नांदीने करून गुरुदेवांना वंदन केले. या संस्थेचे अध्यक्ष श्री. सुरेश साखवळकर संगीत रंगभूमी जिवंत राहावी म्हणून विशेष कार्यरत असतात.

याप्रसंगी बोलताना गुरुदेवांनी बालगंधर्वांच्या अद्भुत, अलौकिक गायनाची तसेच त्यांचे गुरु भास्करबुवा बखले यांच्या गायनाची वैशिष्ट्ये सांगितली. काकासाहेब खाडिलकरांच्या नाट्यगीत लेखनाची अपूर्वाई वर्णन केली. बालगंधर्वांचे वर्णन त्यांनी 'देवदत्त महापुरुष' अशा यथार्थ शब्दात केले. श्री. राम मराठे जोड रागांचे सम्राटच होते, हे सांगताना गुरुदेवांनी त्यांच्या हृद्य आठवणी उलगडल्या.



# हे पाठ कराच! - गुर्वष्टकम्

**दि. १३ जुलै रोजी गुरुपौर्णिमा संपन्न झाली. गुरुच्या चरणी विनम्र का झाले पाहिजे याचा उपदेश या स्तोत्रात आचार्य करतात. प्रत्येकाने तो हृदयात धारण करावा असाच आहे.**

'गृणाति ज्ञानं' आणि 'गिरति अज्ञानं' इति गुरुः, अशी गुरु शब्दाची व्युत्पत्ती आहे. आत्मज्ञानाचा प्रकाश देऊन अज्ञानाचा निरास करणारा सद्गुरु किंवा भगवान श्रीहरी हा त्या शब्दाचा अर्थ आहे. सद्गुरूंच्या अथवा श्रीहरीच्या चरणकमली ज्याचे मन संलग्न झाले नाही, त्याचा जन्म व्यर्थ होय. जन्माला येऊन जे मिळवावयाचे ते जर मिळविले नाही तर त्या जन्माचा आणि वित्त, वैभव, विद्या, कीर्ती इत्यादी इतर गोष्टींचा काय उपयोग? म्हणून सद्गुरूंच्या चरणी अथवा श्रीहरीच्या चरणी मन संलग्न करा असा उपदेश आचार्य या स्तोत्रात करीत आहेत. या स्तोत्राचे वृत्त भुजंगप्रयात आहे.

**शरीरं सुरूपं तथा वा कलत्रं,**
**यशश्चारु चित्रं धनं मेरुतुल्यम् ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे,**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।१।।**

शरीर देखणे आहे, तशीच बायकोही पण सुंदर आहे. वक्ता, लेखक, विद्वान्, प्रेमळ नेता, लोककल्याणकर्ता इत्यादी रूपांनी अनेक प्रकारची कीर्ती आहे, पर्वतप्राय धनाच्या राशी आहेत, सर्व काही आहे, पण मन जर सद्गुरूच्या अथवा श्रीहरीच्या चरणकमली संलग्न झालेले नसेल, तर ते सर्व व्यर्थ होय. त्याचा काय उपयोग?

**कलत्रं धनं पुत्रपौत्रादि सर्वं,**
**गृहं बान्धवाः सर्वमेतद्धि जातम् ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे,**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।२।।**

बायको आहे, पैसा आहे, मुले आहेत. नातवंडे पतवंडे वगैरे सर्व काही आहे. बंगले आहेत. आप्त-इष्ट, सोयरे-धायरे इत्यादी सर्व काही झाले आहे, पण सद्गुरूच्या अथवा श्रीहरीच्या चरणकमली मन लागले नाही, तर या सर्वांचा काय उपयोग?

**षडङ्गादिवेदो मुखे शास्त्रविद्या,**
**कवित्वादि गद्यं सुपद्यं करोति ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे,**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।३।।**

सांगोपांग वेदांचे अध्ययन केले, शास्त्रविद्या मुखोद्गत केली, उत्तम गद्यांची व पद्यांचीही रचना करतो, कवी म्हणून प्रख्यात झाला, पण सद्गुरूंच्या अथवा श्रीहरीच्या चरणी मन जर लागले नाही, तर या सर्व गुणांचा काय उपयोग?

**विदेशेषु मान्यः स्वदेशेषु धन्यः,**
**सदाचारवृत्तेषु मत्तो न चान्यः ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे,**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।४।।**

परदेशामध्ये मान्यता पावला, स्वदेशात धन्य झाला. सदाचाराने वागण्यात आणि नीतिन्यायाने चालण्यात माझ्यासारखा दुसरा कोणी नाही असेही म्हणतो. पण मन सद्गुरूंच्या अथवा श्रीहरीच्या चरणकमली संलग्न झाले आहे काय? ते जर तसे असेल, तर सर्व काही ठीक आहे. नाही तर या सर्वांचा काय उपयोग?

**क्षमामण्डले भूपभूपालवृन्दैः,**
**सदासेवितं यस्य पादारविन्दम् ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे,**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।५।।**

संपूर्ण भूमंडलाचा अधिपती झाला, सम्राट झाला. राजे-रजवाड्यांनी ज्याच्या चरणकमलांची सर्वकाळ सेवा केली. हे सर्व काही झाले, पण मन जर श्रीहरीच्या अथवा सद्गुरूंच्या चरणकमली संलग्न झाले नसेल तर याचा काय उपयोग?

**यशो मे गतं दिक्षु दानप्रतापाज्जगद्वस्तु**
**सर्वं करे मत्प्रसादात् ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे,**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।६।।**

माझ्या दानधर्माने व पराक्रमाने माझी कीर्ती दाही दिशा पसरली. माझ्या कृपेने कोणतीही जगातील वस्तू हस्तगत होऊ शकते! (असे अभिमानाने बोलतो) पण मन श्रीगुरूंच्या अथवा श्रीहरीच्या चरणी रत झालेले नसेल तर याचा काय उपयोग? हे सर्व व्यर्थ होय.

**न भोगे न योगे न वा वाजिराजौ,**
**न कान्तामुखे नैव वित्तेषु चित्तम् ।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे,**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।७।।**

माझे मन आता भोगात रमत नाही व योगातही रमत नाही. घोड्यांची पागा मनाला रुचत नाही व प्रिय पत्नीचे मुख अवलोकन करीत बसण्यातही माझ्या मनाला सुख वाटत नाही. वित्तवैभवातही माझे मन रमत नाही. इतके वैराग्य आहे, पण आचार्य म्हणतात, बाबा रे! तुझे ते मन श्रीहरीच्या अथवा सद्गुरूंच्या चरणकमली तरी संलग्न झाले आहे का? तसे जर नसेल तर मग हे वैराग्यही काय उपयोगाचे?

**अरण्ये न वा स्वस्य गेहे न कार्ये,**
**न देहे मनो वर्तते मे त्वनर्घ्ये ।**
**मनश्चेन्न लग्नं हरेरङ्घ्रिपद्मे,**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।८।।**

अरण्यामध्येही माझे मन रमत नाही व स्वत:च्या घरातही माझे मन लागत नाही. कोणत्याही कामात माझे मन लागत नाही. माझा देह इतका सुंदर बहुमोलाचा, पण त्याचीही आसक्ती आता माझ्या मनात उरली नाही. इतका मी विरक्त झालो आहे, असे म्हणतो, पण श्रीहरीच्या चरणी ते मन लागले असेल तर ठीक आहे. नाही तर या वैराग्याचा काय उपयोग?

**अनर्घ्याणि रत्नानि मुक्तानि सम्यक,**
**समालिङ्गिता कामिनी यामिनीषु ।**
**मनश्चेन्न लग्नं हरेरङ्घ्रिपद्मे,**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।९।।**

बहुमोलाची रत्ने अर्थात् रत्नजडित सुवर्णाचे अलंकार व केवळ रत्नांचेही हार अंगावर आणि गळ्यात घालून त्यांचे यथेच्छ सुख अनुभविले. कांतेच्या समागमात रात्रीच्या रात्री घालविल्या. सगळे काही केले, पण श्रीहरीच्या अथवा सद्गुरूंच्या चरणकमली मन जर संलग्न झाले नसेल तर त्या सर्व सुखांचा काय उपयोग?

**गुरोरष्टकं यः पठेत्पुण्यदेही,**
**यतिर्भूपतिर्ब्रह्मचारी च गेही ।**
**लभेद्वाञ्छितार्थं पदं ब्रह्मसंज्ञं,**
**गुरोरुक्तवाक्ये मनो यस्य लग्नम् ।।१०।।**

मोठ्या पुण्याने नरदेहाचा लाभ झाला असता जो कोणी या गुर्वष्टकाचे पठण करील आणि ज्याचे मन गुरूंनी सांगितलेल्या वाक्यांवर, 'तत्त्वमसि' इत्यादी महावाक्यांच्या अर्थावर संलग्न झालेले असेल, तो कोणीही असो, ब्रह्मचारी असो अथवा गृहस्थाश्रमी असो, तो संन्यासी असो अथवा सम्राट असो, त्याला अभीष्ट असलेले, ब्रह्म या नावाने ओळखले जाणारे, नित्य आणि निरतिशय आनंदरूप असलेले उत्तम पद प्राप्त होईल.

* * *

# कौशिकाश्रम रक्तदान शिबिर

## दि. २३ जुलै २०२२

सौ. अपर्णाताई अभ्यंकर यांचे वडील कै. अच्युतराव कोल्हटकर यांनी संघाच्या ज्येष्ठ प्रचारकांची योग्य अशी काळजी घेता यावी म्हणून कौशिकाश्रम या संस्थेची मित्र मंडळ सोसायटीमधे स्थापना केली. त्यासाठी अपरंपार श्रम करून धन जमवले. आज तेथे उत्तम सेवाकार्य सुरू आहे. रक्तदान शिबिराच्या निमित्ताने गुरुदेव आणि सौ. अपर्णाताई यांनी कौशिकाश्रम स्थापनेचा इतिहास सांगितला.













# अध्यात्मबोध

गुरुदेव



**१) प्रश्नकर्ता : प्रसाद षडांगुळे, पुणे**

**प्रश्न – हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे एकूण किती देवता आहेत, त्यांचे काही वर्गीकरण आहे का? यासाठी शास्त्रीय ग्रंथांचे संदर्भ / प्रमाण असेल तर उद्धृत करून सांगावे.**

**उत्तर –** ऋग्वेदाने सांगितले आहे– 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ।' (१.१६४.४६). अर्थात निर्गुण परमात्मा एकच आहे, पण सगुण रूपात त्याला आत्मज्ञानी विविध नावाने संबोधतात. इन्द्र, मित्र, वरुण, अग्नी, सुपर्ण, यम, मातरिश्वन्, ब्रह्मा, विष्णू, महेश, दत्त, गणेश, देवी, सूर्य अशी अनंत सगुण रूपे त्याचीच आहेत. एकाच लाकडापासून टेबल, खुर्ची, तिपाई, चौपाई, खिडकी इत्यादी अनंत वस्तू तयार होतात. सागवान, जंगली असे अनेक प्रकार असले तरी त्याला लाकूड वा काष्ठ हे एकच नाव असते. सोने एकच असले तरी चपलाहार, गोफ, कंठा, बाजूबंद, अंगठी, गोठ, तोडे, पाटल्या, बिल्वर असे अनंत अलंकार होतात. त्याचप्रमाणे एका परमतत्त्वातून अनंत ब्रह्माण्डे व प्राणिमात्र निर्माण होतात.

३३ कोटी म्हणजे अगणित देवता असा अर्थ आहे. पण इतकी नावे कुणाच्या लक्षात राहतील? म्हणून संक्षेपाने ३३ नावे दिली. या भूतलावर हिंदू धर्म हा लोकशाहीचा एकच धर्म आहे. आपण आपल्या आवडीची वस्तू वा अलंकार विकत घेतो. त्याचप्रमाणे आपल्याला आवडणाऱ्या कोणत्याही सगुण रूपात आपण परमेश्वराचे पूजन करू शकतो. 'अनंत रूपे अनंत वेषे देखिले म्यां त्यासी' हा ज्ञानदेव माउलींचा अनुभव त्याच विराट एकात्मतेचा आणि विस्ताराचा आहे!

(आदित्य प्रतिष्ठान प्रकाशित भारतीय आचार्य व श्रीगणपति अथर्वशीर्ष हे दोन ग्रंथ अवश्य वाचा.)

**२) प्रश्नकर्ता : जिज्ञासू**

**प्रश्न – 'सत्यं वद, प्रियं वद, सत्यमपि अप्रियं न वद' या वचनाचा उपयोग व्यवहारात कसा करावयाचा?**

**उत्तर –** आपण ज्या वचनाचा उल्लेख केला, ते सुभाषित मनुस्मृतीत आले आहे. ते असे–

'सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्न ब्रूयात्सत्यमप्रियम् ।
प्रियं च नानृतं ब्रूयादेष धर्मः सनातनः ॥'
(मनुस्मृती ४.१३८)

'खरे बोलावे, प्रिय बोलावे, खरे पण अप्रिय असेल ते बोलू नये आणि प्रिय म्हणून खोटे बोलू नये हाच शाश्वत धर्म आहे.'

सत्य बोलण्याने धर्ममर्यादा राखली जाते, प्रिय बोलण्याने लोकसंग्रह वाढतो! अप्रिय सत्य बोलण्याने लोकसंग्रहाला बाधा येते, प्रिय पण असत्य बोलण्याने दोघांचाही घात होण्याची शक्यता असते, म्हणून असे वचन हानिकारक असल्याने त्याज्य आहे. तथापि अधिकारपरत्वे अप्रिय सत्य खुबीनेही सांगता येते.

एका राजाला दोन ज्योतिषांनी भविष्य सांगितले. पहिला म्हणाला, 'राजा! तुझ्या डोळ्यासमोरच तुझ्या कुटुंबातील सर्व मंडळी मृत्यू पावतील.' दुसरा म्हणाला, 'राजा! तुझ्या कुटुंबात सर्वात तूच दीर्घायुषी होशील!' दोघांच्या म्हणण्याचा अर्थ एकच! पण राजाने पहिल्याचा वध केला, दुसऱ्याला पारितोषिक दिले. अप्रिय पण सत्य गोष्ट व्यावहारिक तारतम्याने सांगता येते!

**३) प्रश्नकर्ता : विधिज्ञ विंग कमांडर वसंत नारायण देशमुख, बेंगळुरू**

**प्रश्न – भगवान श्रीकृष्णांनी गीतेत म्हटले आहे- 'वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन । भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ।।' (गीता ७.२६) म्हणजे सर्व घटना अलिखित व अटळ अशा विधिलिखितानुसारच सतत चालू असतात व राहतील. हेच श्रीमद्भगवद्गीतेचे एकमेव रहस्य आहे, असे मला वाटते योग्य की चूक ते आपण सांगावे ही विनंती.**

**उत्तर –** आपण गीतेतील उल्लेख केलेला श्लोक महत्त्वाचा आहे. तथापि विधिलिखितात प्रारब्ध येते. क्रियमाण कर्म येत नाही. सगळेच विधिलिखिताप्रमाणे घडू लागले, तर मानवाच्या पुरुषार्थाला, स्वकर्माला अर्थच उरणार नाही. 'नियतं कर्म कुरु त्वं--' हा तर भगवान श्रीकृष्णांचा आदेश आहे. गीतेविषयी परंपरा अशी आहे, 'धर्मशास्त्रेषु वेदान्ता: तत्र गीता महत्तमा। तत्र पञ्चदशोध्याय: तत्र श्लोक चतुष्टयम् ।।' अर्थात सर्व धर्मशास्त्रात वेदान्त महान आहे, वेदान्तातही गीता सर्वश्रेष्ठ आहे (कारण उपनिषदांचे सार गीतेत आले आहे), गीतेतही १५ वा अध्याय सर्वश्रेष्ठ आहे (कारण तो ज्ञानयोगाचा कळस आहे), त्यातही १६ ते १९ हे चार श्लोक सर्वोत्तम आहे. कारण त्यात गीतासार आहे. ते पुढीलप्रमाणे–

'या लोकी क्षर म्हणजे नाशवंत आणि अक्षर म्हणजे अविनाशी असे दोन प्रकारचे पुरुष आहेत. सर्व प्राणिमात्रांना क्षर आणि कूटस्थ जीवात्म्याला अक्षर म्हटले जाते.

'उत्तम' पुरुष तर निराळाच आहे जो तीनही लोकात प्रवेश करून त्यांचे भरणपोषण करतो. तो अव्यय असा ईश्वर 'परमात्मा' या नावाने उद्धृत केला जातो.

कारण मी (म्हणजे परमेष्टीस्वरूप परमात्मा) क्षर म्हणजे नाशवंतांपासून सर्वथा अतीत आहे आणि अविनाशी जीवात्म्याहूनही उत्तम आहे. म्हणून सर्व लोकांमध्ये आणि वेदामध्येही मी (म्हणजे परमेश्वर परमात्मा) 'पुरुषोत्तम' म्हणून प्रसिद्ध आहे.

हे भरतवंशी अर्जुना! याप्रमाणे जो असंमूढ म्हणजे ज्ञानी पुरुष मज 'पुरुषोत्तमा'ला जाणून घेतो, तो सर्वज्ञ पुरुष मलाच सर्वभावाने भजतो.'

यालाच आत्मज्ञानी म्हणतात. क्षेत्रक्षेत्रज्ञाचे (म्हणजेच क्षर अक्षराचे) जे ज्ञान ते खरे ज्ञान होय आणि हे जाणणारा ज्ञानी होय, असे भगवंतांनी १३ व्या अध्यायात स्पष्ट सांगितले आहे.

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।
एतद्यो वेत्ति तं प्राहु: क्षेत्रज्ञ इति तद्विद: ।।१।।
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ।।२।।

आणि हे भारत, अर्जुना! सर्व क्षेत्रात क्षेत्रज्ञ अर्थात जीवात्माही मलाच समज. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचे जे तत्त्वत: ज्ञान तेच खरे 'ज्ञान' असे माझे मत आहे.

यावर सत्ता चालते ती परमेष्टीची, परमात्म्याची! वरील चार श्लोकांत सगळी गीता आली आहे.

* * *

# संत एकनाथांची 'नीती'



सदाचार म्हणजे काय, तो कसा पाळावा, त्याची पथ्ये कोणती याचे अप्रतिम मार्गदर्शन नाथांनी खालील स्फुटात केले आहे.

**नीति सांगतों ऐका एक । दास सभेचा सेवक ।**
**मन टाळूं नका एक । कोणी एक ।।ध्रु.।।**

**सांडावरून जाऊं नये । लांच खाऊं नये ।**
**चोहट्यांत राहूं नये । कोणी एक ।।१।।**

**अक्रीत घेऊं नये । इमान सोडूं नये ।**
**बैमान होऊं नये । कोणी एक ।।२।।**

**सज्जनाशीं विटूं नये । नीचासवें बाटूं नये ।**
**तस्कराशीं पुसूं नये । कोणी एक ।।३।।**

**भक्तिमार्ग खंडूं नये । कुभांड्यासी तंडूं नये ।**
**खळासंगें भांडूं नये । कोणी एक ।।४।।**

**सत्पुरुषाशीं छळूं नये । शिवेचा गुंडा ढाळूं नये ।**
**केला नेम टाळूं नये । कोणी एक ।।५।।**

**सद्गुरुसेवा सोडूं नये । कुळधर्मासी मोडूं नये ।**
**पापद्रव्य जोडूं नये । कोणी एक ।।६।।**

**संपत्ति आलिया माजूं नये । अभिमानें फुगूं नये ।**
**सभा देखून लाजूं नये । कोणी एक ।।७।।**

**असत्य वाद करूं नये । खोटा संग धरूं नये ।**
**मोचकाशीं मैत्री करूं नये । कोणी एक ।।८।।**

**भलते भरीं पडूं नये । अनाचार करूं नये ।**
**कपट मनीं धरूं नये । कोणी एक ।।९।।**

**जन्माआलीया स्वभावें । कांही सार्थक करावें ।**
**ऐसें मनीं विचारावें । कोणी एक ।।१०।।**

**एका जनार्दनीं भावें । संतचरणीं लीन व्हावें ।**
**सदा हरिनाम उच्चारावें । कोणी एक ।।११।।**

* * *

## आदित अमित परांजपे याचे सुयश!



**आदित्यव्रती सौ. अलका परांजपे व श्री. अनिल परांजपे यांचा नातू. आदितने ९३.२% गुण मिळवून दहावीच्या परीक्षेत उत्तम यश मिळवले आहे. त्याचे आदित्य प्रतिष्ठानच्या परिवाराकडून मन:पूर्वक अभिनंदन! आदितला बॅडमिंटन तसेच पोहायला आवडते. वाचनाची आवड आहे. आता सायन्सला ॲडमिशन घेतली आहे. त्याला वैमानिक (पायलट) व्हायचे आहे.**

# कथ्थक परंपरेचा सन्मान

दि. ३ जुलै ते ३ ऑगस्ट २०२२ जर्मनी दौरा टान्झ कथ्थक ॲकॅडमी तर्फे गुरु तेजस्विनी साठे यांच्याबरोबर गुरुदेवांची नात अरुंधती अभ्यंकर, रेवा जोशी, रीना लेले व आलापी जोग यांनी नुकताच जर्मनीचा दौरा केला. या एका महिन्यात त्यांचे ब्राऊनश्वाईग महाराष्ट्र मंडळ, म्युनिक महाराष्ट्र मंडळ, कार्लस्रुह इंडिया समर फेस्ट, स्टुटगार्ड थिएटर आणि बर्लिन महाराष्ट्र मंडळ येथे कार्यक्रम झाले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दिल्लीत २६ जानेवारीला परेडमध्ये यांना कला सादर करायला मिळाली. तसेच नुकतेच त्यांना भारत सरकारतर्फे उझबेकीस्तान व कजाकीस्तान येथे नृत्य सादर करता आले.



















# अवश्य पहा, ऐका!



## Aditya Pratishthan
## 'U Tube' चॅनेल



पूजनीय गुरुदेव शंकर अभ्यंकर यांनी आजवर केलेल्या प्रवचनमालांच्या व कीर्तनांच्या मालिकांचा आणि गुरुपत्नी सौ. अपर्णाताई यांच्या पठण मालिकांच्या श्रवणाचा आनंद आता तुम्ही आदित्य प्रतिष्ठानच्या 'Aditya Pratishthan' या नावाच्या 'U Tube' चॅनेलवर घेऊ शकता. आपण या चॅनेलचे विनामूल्य सभासद व्हा व इतरांनाही उद्युक्त करा.

### अ) 'Video' (दृश्य-श्राव्य)







| | प्रवचनमाला व पठण | श्रोते-दर्शक संख्या |
|---|---|---|
| १) | श्रीमद् भागवत प्रवचनमाला (१ ते ७ भाग) – | ८,३७,००० |
| २) | शिवशंकर महारुद्र प्रवचनमाला (१ ते ५ भाग) – | १,३५,००० |
| ३) | वाल्मीकि रामायण प्रवचनमाला (१ ते ७ भाग) – | ७०,९०० |
| ४) | भगवान श्रीकृष्ण प्रवचनमाला (१ ते १० भाग) – | ४,३३,००० |
| ५) | स्वामी विवेकानंद प्रवचनमाला (१ ते ३ भाग) – | ७६,००० |
| ६) | लोकमान्य टिळक चरित्रमाला (१ ते ७ भाग) – | १९,४०० |
| ७) | स्तोत्रपठण – (कालभैरवाष्टकम् , वेदसारशिवस्तवः, आत्मषटकम्, शिवमानसपूजा, विष्णुसहस्रनाम, श्रीसूक्त, – संपूर्ण गीता पठण, श्रीरामस्तुती, समर्थ रामदासकृत रामनामावली, मनाचे श्लोक, श्रीगणेश द्वादशस्तोत्रे, शिवस्तोत्रे | २७,२९,१७३ |
| ८) | वारकरी कीर्तन (१ ते १० भाग) – | २२,५०० |

सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर आणि गुरुदेव शंकर अभ्यंकर यांच्या ऑडिओ व्हिडिओंसाठी विनामूल्य Subscribe करा Aditya Pratishthan या यूट्यूब चॅनेलवर.


## अवश्य ऐका!



## Aditya Pratishthan 'U Tube' चॅनेल

### आ) 'Audio' (श्राव्य)

| प्रवचनमाला | श्रोते-दर्शक संख्या |
|---|---|
| १) श्रीगणपती अथर्वशीर्ष प्रवचनमाला (१ ते १० भाग) – | १,३६,००० |
| २) रामायणातील दंतकथा (१ ते १४ भाग) – | ३८,९०० |
| ३) ग्रंथराज दासबोध प्रवचनमाला (१ ते ८ भाग) – | २,१९,००० |
| ४) छत्रपती शिवाजी महाराज प्रवचनमाला (१ ते ८ भाग) – | ५०,८०० |
| ५) झांशीची राणी व्याख्यानमाला (१ ते ३ भाग) – | १२,४०० |
| ६) लोकमान्य टिळक तेजस्वी चरित्रमाला (१ ते २ भाग) – | १९,००० |
| ७) स्वातंत्र्यवीर सावरकर प्रवचनमाला (१ ते ८ भाग) – | ३३,३०० |






## अवश्य ऐका!


## Aditya Pratishthan
## 'U Tube' चॅनेल


### आ) 'Audio' (श्राव्य)

| प्रवचनमाला | श्रोते-दर्शक संख्या |
|---|---|
| ८) सांगीतिक चरित्रकथन (१ ते ८ भाग) – | ३३,८०० |
| ९) विष्णुसहस्रनाम अर्थ व विवरण (१ ते ७१ भाग) | |
| १०) श्रीसूक्त प्रवचनमाला (१ ते ५ भाग) – | २,०९,००० |
| ११) दिनविशेष (१ ते १३ भाग) – | २,३२,००० |
| १२) अन्य | २,१२,४७३ |









* एकूण Audio-Video संख्या २१४
* दि. ३१ जुलै २०२२ अखेर श्रोते-दर्शक संख्या ५२,८३,३४६
* आदित्य प्रतिष्ठान चॅनेल पाहणाऱ्यांची संख्या
  – दोन कोटी तीस लाखांहून अधिक
* सभासद (Subscribers) संख्या ३६,४००
* आजच विनामूल्य सभासद व्हा!

Subscribe to Aditya Pratishthan :


।। श्रीराम प्रसन्न ।।


गुरुदेवांच्या सिद्धहस्त लेखणीतून अवतरलेले


# शङ्कर रामायण

(वाल्मीकि रामायणावरील मराठी ओवीबद्ध रचना)

## सवलत योजना




### प्रकाशित तीन खण्ड

| शङ्कर रामायण | डबलडेमी पृष्ठे | ओवीसंख्या | देणगी मूल्य रुपये |
| --- | --- | --- | --- |
| १) बालकाण्ड - | ६५६ | ११,२५४ | ३५०/- |
| २) अयोध्याकाण्ड - | ९६८ | १५,९७२ | ८००/- |
| ३) अरण्यकाण्ड | ६२५ | ७,६४० | ५००/- |
| एकूण | २,२४९ | ३४,८६६ | १,६५०/- |

तीनही खण्ड एकत्र घेतल्यास
सवलत देणगी मूल्य रुपये १,०००/- मात्र

आदित्य प्रतिष्ठानचे ग्रंथ, सीडीज्, पेनड्राईव्हज् यासाठी पहा–
www.adityapratishthan.org